POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

मराठी एकीकरण

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

बातमीपत्र

● वर्ष -०५ ● अंक-४१ ● मुंबई, शनिवार,१३ सप्टेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

महाराष्ट्रातील सर्वात मोठा घोटाळा!

नोकरीसाठी चक्क मंत्रालयात घेतल्या बोगस मुलाखती

जे. जे. रुग्णालयात मेडिकल; नागपूरच्या भामट्याचा धक्कादायक प्रकार

■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक

मंत्रालय... इथं कुणाही ऐ-यागै-याला सहजासहजी प्रवेश मिळत नाही... अगदी फिल्मी डायलॉग मारायचा तर परिंदा भी पर नही मार सकता असं आपण म्हणू शकतो... पण याच मंत्रालयाच्या पाचव्या मजल्यावर बेरोजगार तरुणांच्या चक्क बोगस मुलाखती आयोजित केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. चांगली नोकरी मिळावी अशी अनेकांची इच्छा असते. त्यात सरकारी नोकरीच्या आशेने अनेक तरुण आरोपींच्या जाळ्यात अडकतात. असाच एक प्रकार नागपुरात घडला. नागपूर येथील एका भामट्याने आपल्या कृत्याने संपूर्ण प्रशासकीय यंत्रणेलाच हादरवले आहे. भामट्याने नोकरी इच्छुक असलेल्या बेरोजगार तरुणांच्या चक्क मंत्रालयात मुलाखती घेतल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे.

मंत्रालयात मुलाखती घेऊन नोकरीच्या नावाखाली शेकडो तरुणांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आलाय. मंत्रालयात मुलाखत,

सरकारी हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय चाचणी करुन अनेक तरुणांचा विश्वास संपादन करुन लुटणा-या एका टोळीचा नागपूर पोलिसांनी पदार्फाश केलाय. पोलिसांनी या प्रकरणी मुख्य आरोपीला अटक केली असून त्याच्या टोळीतील काही सदस्य फरार झालेत.

बेरोजगार असलेल्या तरुणांना गाठून नोकरी लावण्याचे आमिष दाखवत फसवणूक करण्यात आल्याचे अनेक प्रकार समोर आले आहेत. असाच प्रकार नागपूरमध्ये समोर आला असून नोकरी देण्याचे सांगून थेट मंत्रालयात मुलाखती घेत अनेकांना गंडा घालण्यात आल्याचा प्रकार समोर आला आहे. मात्र यातून 9 लाख 55 हजार रुपये घेऊन फसवणूक केल्याचे उघड झाले आहे. या प्रकरणी गुन्हा दाखल करत एकाला अटक करण्यात आली. त्यानंतर लॉरेन्सला अटक करण्यात आली असून शिल्पा उदापुरे, वसंतकुमार उदापूरे, विजय पाटणकर, नितीन साठे, सचिन डोळस , आणि बाबर नावाचा शिपाई हे सहा आरोपी अद्याप फरार आहेत. तर मंत्रालयातील काही कर्मचाऱ्याचे याच्याशी धागेदोरे आहे का? या बाजूने पोलिसाचा तपास सुरू आहे.

मुख्य आरोपी 'बंटी-बबली'

आरोपीने सरकारी नोकरीच्या बनावट जाहिराती देऊन बेरोजगार तरुणांना जाळ्यात ओढले. ते प्लेसमेंट एजंट आणि सरकारी अधिकारी म्हणून वावरत असत. मुख्य आरोपी लॉरेन्स हेनरी आणि त्याची पत्नी शिल्पा यांनी ह्यबंटी-बबलीह्न जोडीप्रमाणे काम केले. भामट्यांनी नागपूरमध्ये जॉब कन्सल्टन्सी फर्मच्या नावाखाली कार्यालय उघडले होते.

पाच ते दहा लाख उकळले

इच्छुक उमेदवारांना मंत्रालयातील कनिष्ठ लिपिक पदासाठी थेट मुलाखतीचे आमिष दाखवले जायचे. उमेदवारांकडून मूळ कागदपत्रे गोळा केले जात असत आणि ५ लाख ते १० लाख रुपयांपर्यंतची रक्कम हप्त्यांमध्ये वसूल केली जायची. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, या ठगाने मुंबईतील चक्क मंत्रालयातच बनावट मुलाखती घेतल्या.

FAQ

1. मुंबईतील नोकरी फसवणूक प्रकरण काय आहे?

मुंबईतील मंत्रालयात खोट्या मुलाखती आणि सरकारी रुग्णालयात वैद्यकीय चाचण्या घेऊन बेरोजगार तरुणांची फसवणूक करणाऱ्या टोळीचा नागपूर पोलिसांनी पदार्फाश केला आहे. या टोळीने अनेक तरुणांना नोकरीचे आमिष दाखवून लाखो रुपये लुटले.

2. या फसवणुकीत कोणत्या पद्धती वापरण्यात आल्या?

टोळीने बेरोजगार तरुणांना मंत्रालयात क्लर्कच्या नोकरीचे आमिष दाखवले. त्यासाठी मंत्रालयाच्या पाचव्या मजल्यावर खोट्या मुलाखती घेतल्या आणि मुंबईतील सरकारी रुग्णालयात वैद्यकीय चाचण्या करवून घेतल्या, ज्यामुळे पीडितांचा विश्वास संपादन केला गेला.

3. किती रक्कम फसवणुकीत लुटण्यात आली?

या प्रकरणात ९ लाख ५५ हजार रुपये फसवणूक करून लुटण्यात आले.

आलं. अमित आणि राहुल या दोघांशिवाय इतरांनाही असंच सांगण्यात आलं होतं. दोन आठवड्यातच नोकरी लावून देतो असं सांगून मुंबईतल्या सरकारी रुग्णालयात वैद्यकीय चाचणीही करवून घेण्यात आली.

एवढं सगळं होतंय म्हटल्यावर पीडितांनी लाखो रुपये भामट्यांच्या हवाली केले. या प्रकरणी नागपूर पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून लॉरेन्स हेन्री नावाच्या एका ठकाला मुंबईतून अटक करण्यात आलीये. तर तीन आरोपी फरार झालेत. फसवणूक करणा-या टोळीची मंत्रालयात मुलाखती घेण्याची हिंमत कुणामुळं झाली याचा तपास करण्याची गरज निर्माण झालीये.

नागपुरातील या भामट्याने 2019 ते 2022 या कालावधीत अनेक बेरोजगार तरुणांना कनिष्ठ लिपिक पदाच्या बनावट नोकरीचे आमिष दाखवून लाखाची फसवणूक केली. प्राथमिक तपासात या भामट्याने सुमारे 1 कोटी 60 लाख रुपयांची फसवणूक केल्याचे उघड झाले असून, ही रक्कम आणखी वाढण्याची शक्यता आहे. नागपूर पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने या प्रकरणी एकाला अटक केली असून, इतर आरोपी फरार आहेत. विशेष म्हणजे, या भामट्यांनी मुंबईतील कडेकोट सुरक्षाव्यवस्था असलेल्या मंत्रालयातच इच्छुक उमेदवारांच्या बोगस मुलाखती घेतल्या. ज्यामुळे मंत्रालयाच्या सुरक्षा आणि प्रशासकीय व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहेत.

नागपूर पोलिसांच्या क्राइम ब्रांचच्या आर्थिक गुन्हे शाखेने (ईओडब्ल्यू) या प्रकरणाची चौकशी सुरू केल्यानंतर मुख्य आरोपी लॉरेन्स हेनरी (४५, रा. नागपूर) याला मुंबईतून अटक केली. लॉरेन्स हेनरी सूत्रधार असून, त्याची पत्नी शिल्पा हेनरी उर्फ शिल्पा उदापुरे (वय ४०), वसंतकुमार उर्फ वसंतराव उदापुरे (६०), विजय पटणकर (४०), नितीन साठे (४१), सचिन डोलास (४५) आणि एक चतुर्थश्रेणी कर्मचारी (नाव अज्ञात) हे इतर आरोपी आहेत. यापैकी लॉरेन्स हेनरी याला अटक केली असून, इतर सर्व आरोपी फरार आहेत. पोलिस त्यांचा शोध घेत आहेत.

जे. जे. हॉस्पिटलमध्ये मेडिकलही !

नितीन साठे हा ह्यराम यादवह्न नावाने अवर सचिव (अंडर सेक्रेटरी) म्हणून सोंग करत असे आणि मुलाखती घेत असे. मुलाखतीनंतर उमेदवारांना बनावट ओळखपत्रे देऊन आणि जेजे हॉस्पिटलमध्ये बनावट वैद्यकीय तपासणी करून विश्वास बसवला जायचा.

एलफिन्स्टन पूल पाडू देणार नाही ! स्थानिक रहिवाशांचा विरोध कायम

■मुंबई । प्रतिनिधी,

शिवडी-वरळी उन्नत मार्गामधील एलफिन्स्टन पूल आज मध्यरात्री वाहतुकीसाठी बंद केला जाणार असे जाहीर केलेले असताना या पुलाच्या पाडकामाला स्थानिक रहिवाशांचा विरोध आजही कायम राहिला. एलफिन्स्टन पुलाचे पाडकाम आणि पुनर्बांधणीच्या कामामुळे परिसरातील १९ इमारती प्रभावित होणार आहेत . या इमारतींचा पुनर्विकास केला जाईल याची लेखी हमी दिल्याशिवाय पूल पाडू देणार नाही,अशी ठाम भूमिका स्थानिक भाजपा आमदार कालिदास कोळंबकर यांनी आज मांडली. या उन्नत मार्ग प्रकल्पामुळे सुरुवातीला एलफिन्स्टन पूल परिसरातील १९ इमारती बाधित होणार होत्या. मात्र एमएमआरडीने प्रकल्पाच्या आरेखनात केलेल्या फेरबदलांमुळे केवळ लक्ष्मी निवास आणि हाजी नुरानी चाळ या दोन इमारतीच बाधित होणार आहेत. या दोन इमारतींमधील मिळून ८३ रहिवाशांना त्याच परिसरातील म्हाडाच्या इमारतींमध्ये सदनिका देण्यात येणार आहेत. त्यासाठी ३०० चौरस फूटपेक्षा कमी क्षेत्रफळ असलेल्या घरमालकांना ३०० चौ.फू. अधिक ३५ टक्के अतिरिक्त क्षेत्र मिळून ४०५ चौ.फु.क्षेत्रफलाची सदनिका तर ३०० ते १२९२ चौ.फु. क्षेत्रफळ असलेल्या घरमालकांना सध्याच्या क्षेत्रफळावर अतिरिक्त ३५ टक्के क्षेत्रफळ असे निकष निश्चित करण्यात आले आहेत असे म्हाडाने सांगितले.

सायबर पोलिसांची मोठी कामगिरी: फसवणूक झालेली ₹९६,०००/- रक्कम तक्रारदारास परत मिळवून दिली!

■मिरा-भाईंदर। प्रतिनिधी,

काशीगाव (मिरा-भाईंदर, वसई-विरार) : सायबर पोलिसांनी सतर्कतेने व तातडीने कारवाई करत एका महिलेची ऑनलाईन फसवणूक झालेली ₹९६,०००/- रक्कम बँकेत थांबवून तिला परत मिळवून देण्यात यश मिळवले आहे. तक्रारदार श्रीमती घाडगे यांना एका अनोळखी इसमाने फोन करून, त्यांच्या नातेवाईकांच्या नावाने रक्कम पाठविल्याचा बनावट संदेश मोबाईलवर पाठवला. यानंतर अधिक रक्कम ट्रान्सफर झाल्याचे भासवून उर्वरित रक्कम परत पाठवण्यास सांगण्यात आले. विश्वास ठेवून, कोणतीही खात्री न करता तक्रारदारांनी दिलेल्या मोबाईल क्रमांकावर पैसे ट्रान्सफर केले. नंतर बँक खात्यात काहीच रक्कम जमा न झाल्याचे लक्षात आल्यानंतर त्यांनी तत्काळ सायबर पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली.

तक्रार सायबर क्राईम पोर्टल (NCCRP Portal) वर

31904250063678 या क्रमांकावर नोंदवण्यात आली. पोलिसांनी संशयिताचे बँक खाते त्वरित फ्रीझ करून रक्कम थांबवली. त्यानंतर तक्रारदारांना न्यायालयात अर्ज करण्यास सांगण्यात आले. न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार रक्कम तक्रारदाराच्या मूळ खात्यात परत करण्यात आली. तक्रारदाराच्या पतींना प्रतिकात्मक चेक देऊन माहिती देण्यात आली.

फसवणूक टाळण्यासाठी सायबर पोलिसांकडून महत्वाच्या सूचना:

- अनोळखी व्यक्तीकडून आलेल्या फोनवर आर्थिक माहिती देऊ नका.
- कोणताही संदिग्ध SMS/लिंक उघडण्यापूर्वी पडताळणी करा.
- बँकेसंबंधी माहिती मिळवण्यासाठी थेट बँकेत जावं, फोनवर माहिती देऊ नये.
- कोणतेही ॲप डाऊनलोड करताना ते अधिकृत आणि सुरक्षित आहे का, हे तपासा.
- फसवणूक झाल्यास तात्काळ 1930/1945 या हेल्पलाईनवर संपर्क साधावा किंवा www.cybercrime.gov.in या वेबसाईटवर तक्रार दाखल करावी.

सदरची कामगिरी श्री. संदिप डोईफोडे, पोलीस उप आयुक्त (गुन्हे), श्री. मदन बल्लाळ, सहा. पोलीस आयुक्त (गुन्हे), मि.भा.व.वि.पोलीस आयुक्तालय यांच्या मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी सायबर पोलीस ठाणे पोलीस निरीक्षक सुजितकुमार गुंजकर यांचेसह सपोनि /स्वप्नील वाव्हळ, पोउपनिरी/ प्रसाद शेनोळकर, पोउनि / वैभव धनवडे, मपोहवा/ माधुरी धिडे, मपोअं/ सुवर्णा माळी, मपोअं/ स्नेहल पुणे, पोअं/ राहुल बन, मसुब राजेश भरकडे सर्व नेम- सायबर पोलीस ठाणे यांनी पार पाडली आहे.

सायबर फसवणुक हेल्पलाईन क्रमांक: १९३०/१९४५

सायबर फसवणुक हेल्पलाईन वेबसाईट www.cybercrime.gov.in

राज्यात पावसाचा जोर वाढण्याचा इशारा; अलर्ट जारी

■मुंबई । प्रतिनिधी,

बंगालच्या उपसागराच्या वायव्य भागात कमी दाबाचा पट्टा सक्रिय झाल्याने आंध्र प्रदेश, ओडिशा आणि महाराष्ट्रात पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढण्यास सुरुवात झाली आहे. गेल्या दोन ते तीन दिवसांपासून मराठवाडा आणि विदर्भात ढगाळ वातावरण टिकून असून अनेक भागात अतिवृष्टी झाल्याची नोंद झाली आहे. सोलापूर जिल्ह्यातील १३ मंडळात विशेषतः अतिवृष्टीमुळे घरांमध्ये पाणी शिरल्याने नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. हवामान खात्याच्या अंदाजानुसार पुढील चार दिवस महाराष्ट्रात पावसाचा जोर अधिक वाढणार असून १३ सप्टेंबर रोजी मराठवाडा प्रदेशात जोरदार पाऊस पडण्याची शक्यता आहे. १३ व १४ सप्टेंबरला कोकण, गोवा आणि मध्य महाराष्ट्रात मुसळधार पावसाचा अंदाज वर्तवण्यात आला आहे. विशेषतः विदर्भ मराठवाडा व मध्य महाराष्ट्रात पुढील दोन दिवस पावसाचा जोर अधिक राहणार असून कोकण किनारपट्टी, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यांना हायअलर्ट जारी करण्यात आला आहे. रविवारपासून विदर्भात पावसाचा जोर कमी होण्याची शक्यता असून मराठवाडा, मध्य महाराष्ट्र, उत्तर महाराष्ट्र आणि कोकण किनारपट्टीवर पावसाला पोषक वातावरण असण्याची माहिती हवामान खात्याने दिली आहे. १३ सप्टेंबर रोजी धाराशिव, लातूर, सांगली, रायगड आणि सातारा घाटमाथ्यावर पावसासाठी ऑरेंज अलर्ट जाहीर केला असून विदर्भ, मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रातील उर्वरित जिल्ह्यांना येलो अलर्ट देण्यात आला आहे. मुंबई आणि ठाणे भागातही पावसाचा जोर अधिक राहण्याचा अंदाज आहे. पालघर, धुळे, नंदुरबार आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात हलक्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. १४ सप्टेंबर रोजी रायगड, रत्नागिरी व पुणे घाटमाथ्यावर पावसासाठी ऑरेंज अलर्ट जाहीर केला असून मुंबई, ठाणे, नाशिक, जळगाव, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, पुणे, सातारा, सांगली, कोल्हापूर, सिंधुदुर्ग आणि संपूर्ण मराठवाड्यात येलो अलर्ट जाहीर करण्यात आले आहे.

दिल्ली व मुंबई हायकोर्टाला बॉम्बधमकी ! न्यायालयांचे काम ठप्प

■मुंबई । प्रतिनिधी,

देशाची राजधानी दिल्ली आणि आर्थिक राजधानी मुंबईतील उच्च न्यायालयांना आज आलेल्या बॉम्बस्फोटाच्या धमकीने संपूर्ण देशात खळबळ उडवली. देशातील न्यायव्यवस्थेच्या केंद्रबिंदूंना मिळालेल्या या धमक्या अत्यंत गंभीर असल्याने न्यायालयीन कामकाज ठप्प झाले होते. न्यायालयांचे परिसर रिकामा करण्यात आला. सुरक्षा यंत्रणांनी तातडीने शोधमोहीम राबवत तपास केला. या प्रकाराची गंभीर दखल घेत सरन्यायाधीश भूषण गवई यांनी दोन्ही उच्च न्यायालयातील बॉम्ब धमकी प्रकरणाचा सविस्तर अहवाल मागवला आहे. दिल्ली पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार सकाळी ९ वाजताच्या सुमारास ई-मेल प्राप्त झाला.यामध्ये मजकूर जोता की,आजच्या दिल्ली उच्च न्यायालयातील स्फोटाने पूर्वीच्या धमक्यांवरील शंका दूर होतील. दुपारी २ वाजेपर्यंत परिसर रिकामा करावा. १९९८ च्या पाटणा बॉम्ब स्फोटांची पुनरावृत्ती होणार आहे.दुपारी नमाजानंतर न्यायाधीशांच्या चेंबरमध्ये हा स्फोट होईल.त्यानंतर सर्व खंडपीठांनी सुनावण्या थांबवल्या आणि न्यायालय रिकामे केले. बॉम्ब शोध व निकामी करणारे पथक घटनास्थळी दाखल झाले .त्यांनी संपूर्ण परिसर बंदिस्त करून तपासणी केली. या तपासात कोणतीही संशयास्पद वस्तू आढळली नाही. त्यानंतर दुपारी मुंबई उच्च न्यायालयालाही बॉम्ब धमकीचा ई-मेल मिळाला. त्यानंतर न्यायालयीन सुनावण्या थांबवून मुख्य न्यायाधीश चंद्रशेखरांसह न्यायाधीशांकडून न्यायलय परिसर रिक्त करण्यात आला. त्याचबरोबर वकील, कर्मचारी व न्यायालयीन परिसरातील लोकांना परिसरातून तात्काळ बाहेर जाण्याच्या सूचना दिल्या होत्या.मुंबई पोलिसांनी सांगितले की, न्यायालय परिसरात कोणतीही संशयास्पद वस्तू सापडलेली नाही. धमकी खोटी असल्याचे निश्चित झाले आहे. तर न्यायालयीन परिसरात प्रवेश पुन्हा सुरु केला आहे.

महाराष्ट्रातील ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांसाठी आरक्षण जाहीर

■मुंबई । प्रतिनिधी,

राज्यातील ३४ जिल्हा परिषद अध्यक्षपदांच्या आरक्षणाची घोषणा ग्रामविकास विभागाने केली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांची तयारी सुरू असतानाच हा निर्णय जाहीर झाला असून, लवकरच निवडणुकीची तारीख घोषित होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या दोन अडीच वर्षांपासून जिल्हा परिषदेच्या निवडणुका रखडल्या होत्या. आरक्षणाचा मुद्दा मोठ्या प्रमाणावर चर्चेत होता. हायकोर्टाच्या निर्णयानंतर प्रक्रियेला वेग आला आणि अखेर आरक्षणाची अंतिम यादी प्रसिद्ध झाली. मुख्य निवडणूक अधिकाऱ्यांची बैठक नवी दिल्लीतील इंडिया इंटरनॅशनल इन्स्टिट्यूट फॉर डेमॉक्रसी अँड इलेक्टोरल मॅनेजमेंट येथे पार पडली. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या हस्ते या परिषदेचे उद्घाटन झाले. यावेळी निवडणूक आयुक्त डॉ. सुखबीरसिंग संधू व डॉ. विवेक जोशी उपस्थित होते.आरक्षण काढताना २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या गृहीत धरली गेली. वर्धा , नंदूरबार, पालघर, परभणी अनुसूचित जातीसाठी आरक्षण जाहीर झाले आहे. तर अनुसूचित जातीच्या महिलांसाठी चंद्रपूर, वाशिम, अकोला, हिंगोली, बीड, अहिल्यानगर येथे आरक्षण जाहीर करण्यात आले आहे.

उड्डाणानंतर विमानाचे चाकच धावपट्टीवर पडले

■मुंबई । प्रतिनिधी,

गुजरातमधील कांडला येथून मुंबईला येणाऱ्या स्पाइसजेटच्या द400 विमानाचे बाहेरील चाक उड्डाणानंतर लगेचच धावपट्टीवर निखळून पडले. त्यामुळे हे विमान मुंबईत उतरताना पायलटने आपत्कालीन स्थिती जाहीर केली होती, मात्र सुदैवाने अनर्थ टळला आणि विमान सुरक्षितपणे मुंबईच्या धावपट्टीवर उतरले. झाले असे की, स्पाइसजेटच्या बॉम्बार्डियर DHC8-400 या विमानाने, ज्याचा उड्डाण क्रमांक SG-2906 होता, शुक्रवारी दुपारी २.३९ वाजता कांडला विमानतळाच्या धावपट्टी क्रमांक २३ वरून उड्डाण केले. उड्डाणानंतर लगेचच टॉवर कंट्रोलरला धावपट्टीवर विमानातून एक मोठी

काळी वस्तू पडताना दिसली. दरम्यान तपासणी पथकाने जाऊन पाहिले तेव्हा तिथे विमानाचे चाक पडलेले त्यांना आढळले. मुंबईतील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर (CSMIA) दुपारी १५:५१ वाजता तांत्रिक बिघाडाची नोंद झाल्यानंतर विमानाचे आपत्कालीन लँडिंग करण्यात आले. खबरदारी म्हणून विमानतळ प्रशासनाने संपूर्ण आणीबाणी जाहीर केली होती. तथापि, विमान धावपट्टी क्रमांक २७ वर सुरक्षितपणे उतरले. विमानात क्रूसह सुमारे ७८ प्रवासी होते. ते सर्व सुरक्षित आहेत. लँडिंगनंतर विमानतळावर सामान्य कामकाज पूर्ववत करण्यात आले. बॉम्बार्डियर DHC8-400 मध्ये एक ट्रायसायकल लँडिंग गियर सिस्टम आहे, ज्याच्या नोज गियरवर दोन चाके आहेत आणि प्रत्येक मुख्य लँडिंग गियरवर दोन मुख्य चाके आहेत. स्पाइसजेटच्या प्रवक्त्याने एका निवेदनात म्हटले आहे की, '१२ सप्टेंबर रोजी कांडलाहून मुंबईला जाणाऱ्या स्पाइसजेट द400 विमानाचे बाहेरील चाक टेकऑफनंतर धावपट्टीवर निखळून पडले. मात्र, विमानाने मुंबईकडे प्रवास सुरू ठेवला आणि विमानतळावर सुरक्षितपणे उतरले.

संपादकीय...

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

जीएसटीची कक्षा व इंधनदर

पेट्रोल व डिझेल यांचा समावेश वस्तू व सेवा करात (जीएसटी) करण्याचे सरकारचे नजीकच्या भविष्यात कोणतेही नियोजन नाही, असे अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी स्पष्ट केले आहे. याबाबत राज्यांनी निर्णय घेणे आवश्यक असून राज्यांना तसा प्रस्ताव योग्य वाटल्यास जीएसटी परिषदेच्या बैठकीत त्यावर चर्चा करून निर्णय होईल, हे त्यांचे म्हणणे आहे. गेल्या अनेक वर्षांपासून पेट्रोल व डिझेलच्या किमतींच्या बाबतीत कोणतीही पारदर्शकता व विश्वासार्हता नाही. त्यामुळे पेट्रोलजन्य पदार्थांचा समावेश जीएसटी मध्ये करणे देशातील जनतेच्या हिताचे आहे. जीएसटी सुधारणासंबंधीचा मूळ प्रस्ताव हा केंद्र सरकारचा असताना, पेट्रोल व डिझेलसंबंधीचा प्रस्ताव केंद्र सरकार अथवा भाजपशासित राज्ये जीएसटी परिषदेत का सादर करीत नाहीत? सरकार वसूल करीत असलेले कर व तेल कंपन्याच्या प्रचंड नफ्यामुळे ग्राहकांना पेट्रोल व डिझेलसाठी मूळ दरापेक्षा प्रत्यक्षात फारच जास्त रक्कम मोजावी लागते. उदा. ८ सप्टेंबर २०२५ रोजी आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचा दर प्रती बॅरल ६८.३९ डॉलर होता. एका डॉलरचा दर ८८.०७ रुपये, म्हणजे एक लिटर कच्च्या तेलाचा दर ३७.८८ रुपये येते. यात आयात खर्च, वाहतूक खर्च, तेल शुद्धीकरणाचा खर्च तसेच वितरकाच्या कमिशनचा विचार करता पेट्रोलचा दर प्रतिलिटर कमाल ४४ रुपये येते. प्रत्यक्षात ग्राहकाला प्रतिलिटर साधारण १०४ रुपये मोजावे लागले. म्हणजेच प्रतिलिटर ६० रुपये केंद्र व राज्य सरकारचे विविध कर व तेल कंपन्यांच्या नफ्याचे झाले. आर्थिक वर्ष २०१९-२० ते २०२४-२५च्या पहिल्या तिमाहीपर्यंत केंद्र व राज्य सरकारांना पेट्रोल व डिझेलवरील करापोटी एकूण ३६ लाख, ५८ हजार, ३५४ कोटी रुपयांचे प्रचंड उत्पन्न मिळाले. त्यात केंद्र सरकारला २२ लाख, २१ हजार ३४० कोटी रुपयांचे, तर राज्य सरकारांना १४ लाख, ३७ हजार १४ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. २०२४-२५ मध्ये केंद्र सरकारला पेट्रोल व डिझेलच्या करापासून चार लाख १५ हजार १८१ कोटी रुपयांचे उत्पन्न मिळाले. याव्यतिरिक्त केंद्र सरकारला तेल कंपन्याकडून लाभांश व कंपनी कराची मिळणारी रक्कमही हजारो कोटी रुपयांची असते. आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर मोठ्या प्रमाणात कमी होऊन चालू आर्थिक वर्षाच्या पहिल्या तिमाहीत २५ तेल कंपन्याच्या नफ्यात १०० टक्क्यांपेक्षा जास्त वाढ झालेली आहे. इंडियन ऑईलचा नफा ५६८९ कोटी रुपये (११५ टक्के वाढ), बीपीसीएल चा ६१२४ कोटी रुपये (१०३ टक्के वाढ), एचपीसीएलचा ४३७१ कोटी रुपये (११२८ टक्के वाढ). या तिन्ही सरकारी मालकीच्या कंपन्यांच्या एकत्रित नफ्यात अडीचपट वाढ झालेली आहे.

तेल कंपन्या १५ जून २०१७पर्यंत पेट्रोल व डिझेलचा दर दर १५ दिवसांनी निश्चित करीत असत. परंतु जनतेच्या व पेट्रोलपंप मालकांच्या विरोधाला न जुमानता सरकारने ही पद्धत बंद करून १६ जून २०१७पासून पेट्रोल व डिझेलच्या दरांत बदल रोज लागू करण्यास सुरुवात केली. नंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्चा तेलाचे दर कमी झाले तरी त्याचा फायदा ग्राहकांना न देता तो फायदा सरकारला व तेल कंपन्यांना मिळावा म्हणून सरकारने २२ मे २०२२पासून ती पद्धतही बंद केली. त्यानंतर आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरांत ३० ते ३८ टक्के घट होऊनही त्याचा फायदा ग्राहकांना मिळाला नाही. रशियाकडून आपण ४० टक्के कच्च्या तेलाची खरेदी अत्यंत सवलतीच्या दराने करीत असल्यामुळे सरकारला फार मोठा फायदा झाला. मात्र त्याचा फायदा ग्राहकांना झाला नाही. उलट १ एप्रिल २०२५पासून केंद्राने पेट्रोल व डिझेलच्या उत्पादन शुल्कात लिटरमागे दोन रुपये वाढ केल्याने सरकारच्या उत्पन्नात प्रतिवर्षी ३२ हजार कोटी रुपयांची वाढ झाली. तेल कंपन्या (सरकारच्या संमतीने) ठरवत असलेल्या पेट्रोलजन्य पदार्थांच्या दरात कोणतीही पारदर्शकता व विश्वासार्हता नाही. सरकार पेट्रोल व डिझेलवर करआकारणी करताना ग्राहकांवर अन्यायकारक बोजा टाकते. उदा. राज्यांनी मूल्यवर्धित कराची (व्हॅट) आकारणी करताना ती पेट्रोल व डिझेलच्या मूळ दरांत करणे आवश्यक असते. परंतु प्रत्यक्षात राज्य सरकारे पेट्रोल व डिझेलच्या मूळ दरांत केंद्र सरकार आकारीत असलेली उत्पादन शुल्काची रक्कम मिळवून त्यावर मूल्यवर्धित कराची आकारणी करतात. कर आकारणीची ही अन्यायकारक पद्धत बंद केल्यास पेट्रोलचे दर प्रतिलिटर ५.१५ रुपये, तर डिझेलचे दर ४.१० रु. प्रतिलिटर कमी होऊ शकतात. तसेच राज्य सरकारे व्हॅट आकारणी उत्पादन शुल्काप्रमाणे विशिष्ट रकमेची न करता ती टक्केवारीवर करतात. त्यामुळे ग्राहकांना पेट्रोल व डिझेलचे वाढलेले दर व त्या दरावर भरावा लागणारा व्हॅट असा दुहेरी फटका बसतो. तेल कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाचे दर वाढलेले आहेत, असे सांगून त्याआधारे दरांत वाढ करीत असतात. प्रत्यक्षात तेल कंपन्या आंतरराष्ट्रीय बाजारातून रोज कच्चे तेल खरेदी करीत नाहीत. कच्च्या तेलाच्या किमती कमी असताना त्या देशातील संबंधित तेल कंपन्यांशी त्या करार (किमान तीन महिन्यांचा) करतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय बाजारात कच्च्या तेलाच्या दरांत मोठी वाढ झाली तरी तेल कंपन्या वाढीव दराने नव्हे, तर कराराप्रमाणे कमी किमतीत कच्चे तेल खरेदी करीत असतात. वास्तविक पेट्रोल व डिझेलचे दर नियंत्रणमुक्त करताना, आंतरराष्ट्रीय बाजारात तेलाचे दर कमी झाल्यास त्याचा फायदा ग्राहकांना दिला जाईल, असे आश्वासन केंद्राने जनतेला दिलेले होते. परंतु हे दर घटले तरी सरकार करामध्ये व कंपन्या त्यांच्या नफ्यामध्ये वाढ करून त्याचा फायदा जनतेला देत नाहीत, हा अनुभव आहे. पेट्रोल व डिझेल जीएसटी च्या कक्षेत आणल्यास त्यांच्या दरांत काही प्रमाणात पारदर्शकता व विश्वासार्हता निर्माण होईल, कररचना सुलभ होऊन ग्राहकांवरील कराचा बोजा मोठ्या प्रमाणावर कमी होईल. तसेच भाववाढ कमी होऊन अर्थव्यवस्था मजबूत होईल. परंतु पेट्रोल व डिझेल जीएसटी खाली आणल्यास आपले उत्पन्न मोठ्या प्रमाणावर कमी होईल, या भीतीमुळे केंद्राचा व राज्य सरकारांचा याला विरोध आहे.

लोककल्याणकारी राज्या च्या संकल्पनेशी संबंध नसलेल्या; परंतु केवळ निवडणुका जिंकण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या आर्थिक शिस्तीला बाधक व अर्थव्यवस्थेला घातक अशा योजनांवर केंद्र सरकार व राज्य सरकारे दर वर्षी काही लाख कोटी रुपये खर्च करीत असतात. त्याचा आर्थिक भार पेट्रोलजन्य पदार्थांच्या दरवाढीमुळे सर्वसामान्यांवर पडतो आहे. सरकारने या योजना बंद केल्यास व अनावश्यक खर्चाला आळा घातल्यास पेट्रोल व डिझेलचा समावेश ह्यजीएसटीह्लमध्ये करणे शक्य आहे. सरकार हे करील का, हा प्रश्नच आहे.

आश्वासनांच्या ढिगाऱ्याखाली गाडलेला राज्यातील अन्नदाता

महाराष्ट्रात शेतकरी आत्महत्या हा विषय दशकानुदशके चालत आलेला आहे. विदर्भ आणि मराठवाडा हे दोन भाग तर आत्महत्यांचे केंद्र बनले आहेत. येथे शेतकरी एका हंगामाच्या पिकावर जगतो, ते पीक जरी नासले तरी त्याचे जीवन उद्ध्वस्त होते. सध्या महायुती सरकारच्या काळात ही शोकांतिका अधिक तीव्र होत चालली आहे. काँग्रेसचे वरिष्ठ नेते विजय वडेट्टीवार यांनी नुकतीच समाजमाध्यमांवरून सरकारवर जोरदार टीका केली. त्यांनी स्पष्ट शब्दात म्हटले की, महायुती सरकारने शेतकर्यांना कर्जमाफीचे गोडवे गायले, त्यांच्या भोळ्या-भाबड्या विश्वासाचा गैरफायदा घेतला आणि निवडणुकीत मते मिळवली, पण प्रत्यक्ष सत्तेत आल्यावर हे वचन पूर्ण करण्यात पूर्णपणे अपयशी ठरले. याचा थेट परिणाम म्हणजे केवळ आठ महिन्यांत तब्बल 1 हजार 183 शेतकर्यांनी आत्महत्या केल्या आहेत. यात पश्चिम विदभार्तील 707 आणि छत्रपती संभाजीनगर विभागातील 520 शेतकरी आहेत. वडेट्टीवार यांच्या दाव्याचा विचार करता, महाराष्ट्रात दररोज सुमारे पाच शेतकरी आत्महत्या करतात.

शेतकरी आत्महत्यांच्या मागील मूळ कारणे अनेक आहेत. शेती हा व्यवसाय आजही पावसावर अवलंबून आहे. पाऊस वेळेवर आणि प्रमाणात पडला तर शेतकर्याला थोडा दिलासा मिळतो, पण पावसाचा नादुरुस्त पॅटर्न शेतकर्याचे जीवन उद्ध्वस्त करतो. एका बाजूला अतिवृष्टी तर दुर्सया बाजूला पावसाची टंचाई, गारपीट, वादळ अशा नैसर्गिक आपत्तींचा शेतकर्याला सामना करावा लागतो. यामुळे पिकांचे नुकसान होते आणि उत्पन्नावर पाणी फिरते. याच वेळी उत्पादन खर्च वाढतो. बियाणे, खते, कीटकनाशके, डिझेल, मजुरी या सर्व गोष्टींच्या किमती सातत्याने वाढत आहेत. पण बाजारात मिळणारा भाव तसाच स्थिर किंवा अनेकदा किमान हमीभावापेक्षा कमी असतो.

अशा परिस्थितीत शेतकरी कर्ज घेतो, तेही अनेकदा बँक आणि खासगी सावकार या दोन्हीकडून. बँकांचे कर्ज न मिळाल्यास सावकारांच्या दरवाजावर धाव घ्यावी लागते आणि तेथे व्याजाचा दर इतका जास्त असतो की कजार्चा डोंगर वाढत जातो. या सगळ्या आर्थिक घुसमटीबरोबर सामाजिक दबावही शेतकर्याला पेलावा लागतो. कुटुंबाची जबाबदारी, मुलांचे शिक्षण, विवाह, वैद्यकीय खर्च हे सर्व हातातल्या पैशाशिवाय भागवणे अशक्य होते. गावोगावी प्रतिष्ठेचे राजकारण आहे. शेतकरी आपल्या मुलांना, पत्नीला, घराला जगवण्यासाठी कर्ज घेतो, पण पिके निघाली नाहीत की तो समाजात तोंड दाखवण्यासही लाजतो. अशा परिस्थितीत आत्महत्या हा एकमेव मार्ग शिल्लक राहतो. राजकारण या शोकांतिकेत महत्त्वाची भूमिका बजावते. निवडणुकीत प्रत्येक पक्ष शेतकर्यांचे गोडवे गातो. महायुती सरकारनेही त्याला अपवाद केला नाही. त्यांनी संपूर्ण कर्जमाफीचे आश्वासन दिले. शेतकर्यांनी या वचनावर विश्वास ठेवला आणि मोठ्या संख्येने महायुतीला मते दिली. परंतु सत्तेत आल्यावर महायुतीने तोंड फिरवले. शासनाच्या मते, संपूर्ण कर्जमाफी देणे शक्य नाही, फक्त अत्यंत अडचणीत असलेल्या शेतकर्यांना मदत केली जाईल. त्यासाठी समिती नेमण्यात आली, ज्याचा अहवाल अद्याप आलेला नाही. ही भूमिका म्हणजे सरळसरळ फसवणूक आहे. शेतकरी या आश्वासनाच्या भरवशावर बँकेकडे कजार्ची परतफेड पुढे ढकलत होते. आता जेव्हा सरकारने कर्जमाफी नाकारली, तेव्हा त्यांच्यावर परतफेडीचा डोंगर कोसळला. बँका आणि सावकारांच्या दडपणाखाली ते आत्महत्या करत आहेत. महायुती सरकारने दिलेली इतर आश्वासनेही तशीच धूळ खात पडली आहेत. मृत शेतकर्यांच्या कुटुंबांना तात्काळ मदत मिळेल असे सांगितले गेले, पण प्रत्यक्षात मदत मिळण्याआधी कुटुंबांना शेकडो कागदपत्रे जमा करावी लागतात. पात्रता निकष इतके कठोर ठेवले आहेत की अनेक कुटुंबे मदतीपासून वंचित राहतात. ह्यलाडकी बहीणह्ल योजनेतून महिलांना मासिक आर्थिक मदत मिळेल असे सांगण्यात आले होते, पण निधीअभावी त्यात अडथळे निर्माण झाले. सिंचन प्रकल्प राबवले जातील, पाण्याचे योग्य नियोजन होईल असेही आश्वासन दिले गेले होते, पण प्रत्यक्षात कोणताही ठोस बदल झाला नाही. शेतकर्यांची सर्वात मोठी मागणी असलेली किमान आधारभूत किंमतीवर कायदेशीर हमी याबाबतही कोणतीही पावले उचलली गेली नाहीत. थोडक्यात, सरकारला शेतकर्यांच्या जीवनमरणाशी काहीही देणेघेणे नाही. निवडणुकीत मते मिळवून सत्ता मिळाल्यावर त्यांना शेतकर्यांच्या व्यथा विसरायला वेळ लागत नाही. आत्महत्यांचा आकडा हे सरकारच्या अपयशाचे मोठे प्रमाणपत्र आहे. आज शेतकर्यांसाठी मानसिक आरोग्य सल्ला केंद्रे, समुपदेशन सुविधा, आधार गट यांची गरज आहे.परंतु याकडे कोणी लक्ष देत नाही. सरकारला शेतकरी हा फक्त निवडणूक जिंकण्याचे साधन वाटतो. या सर्व परिस्थितीत उपाययोजना दोन प्रकारच्या असायला हव्यात. तात्काळ आणि दीर्घकालीन. तात्काळ उपाययोजनांत त्वरित कर्जमाफी, नुकसानभरपाई वेळेवर मिळणे, विमा दावे तातडीने मंजूर होणे, मृत शेतकर्यांच्या कुटुंबांना अडथळ्यांशिवाय मदत मिळणे यांचा समावेश होतो. दीर्घकालीन उपाययोजनांत सिंचन व्यवस्थेचा विकास, पावसावर अवलंबून असलेल्या भागांना स्थायी जलस्रोत उपलब्ध करून देणे, उत्पादन खर्च कमी करण्यासाठी अनुदान देणे, पिकांच्या किमतीत स्थिरता आणण्यासाठी किमान हमीभावावर काटेकोर अंमलबजावणी, शेतमाल थेट ग्राहकांपर्यंत पोहोचवण्याची बाजारपेठ उपलब्ध करून देणे यांचा विचार करावा लागेल.

लगेगी आग तो...

गेले काही दिवस नेपाळ जळतोय. देशाची तरुणाई रस्त्यावर आहे. जनतेच्या मनात सत्तेविषयी उद्रेक आहे. प्रचंड अस्वस्थ करणारे हे चित्र आहे. या सगळ्या घडामोडी भारताचे शेजारी असलेल्या दक्षिण आशियाई देशांबरोबर सुरू असून, त्याचा प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष परिणाम भारतावर होत आहे.

गेले पाच दिवस शांतिप्रिय, निसर्गसंपन्न नेपाळ जळतोय. देशाची सर्वोच्च संसद जाळण्यात आली आहे. महत्त्वाच्या नेत्यांची कार्यालये आणि निवासस्थाने जाळण्यात आली. देशाची तरुणाई रस्त्यावर आहे. जनतेच्या मनात सत्तेविषयी उद्रेक आहे. प्रचंड अस्वस्थ करणारे हे चित्र आहे... होय. तेच नेपाळ जे उंच डोंगररांगांनी वेढले गेले आहे, जगातील सर्वात उंच शिखर असलेल्या माऊंट एव्हरेस्टचे वस्तिस्थान आहे, ज्याची शांततापूर्ण-शिस्तबद्ध तसेच हिंदू राष्ट्र म्हणून ओळख सांगितली जाते.

भारत, पाकिस्तान, बांगलादेश व श्रीलंका हे भारतीय उपखंडामधील प्रमुख देश तसेच नेपाळ, अफगाणिस्तान, भूतान व मालदीव या आठ देशांना साधारणपणे दक्षिण आशियाई देश मानले जातात. हे देश सांस्कृतिक, आर्थिक व भौगोलिकदृष्ट्या एकत्र जोडलेले आहेत आणि त्यांचा थेट प्रत्यक्ष- अप्रत्यक्षरीत्या भारताशी संबंध येतो. आंतरराज्य संघर्ष, दहशतवाद, वांशिक संघर्ष, संसाधनांच्या वाटपातील स्पर्धा आणि राजकीय अस्थिरता यामुळे दक्षिण आशियाई देश अशांत आहेत. या प्रदेशात आर्थिक विषमता आणि सामाजिक अशांतताही मोठ्या प्रमाणावर दिसून येते. त्यामुळे अनेक देशांमध्ये अस्थिरतेचे वातावरण आहे. आर्थिक विषमता आणि गरिबीमुळे लोकांमध्ये असंतोष आहे. अनेक देशांमध्ये आर्थिक वाढ मंदावली आहे. कमकुवत आणि अस्थिर राजकीय नेतृत्व यामुळेही गेली काही वर्षे या देशांमध्ये प्रचंड अस्थिरता आणि उलथापालथ सुरू आहे. जागतिक पातळीवर सुरू असलेल्या सत्तासंघर्षाचा प्रचंड मोठा परिणाम या दक्षिण आशियाई देशांवर होत आहे.

ड्रॅगनच्या रूपाने चीन या दक्षिण आशियाई देशांमध्ये प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रूपाने शिरकाव करून त्यांना गिळंकृत करू पाहत आहे. या ड्रॅगनच्या हल्ल्यातून हे दक्षिण आशियाई देश वेळीच सावरले नाहीत तर जागतिक सत्तासंघर्षात स्वतःचे अस्तित्व गमावून बसतील किंवा दिवाळखोरीच्या उंबरठ्यावर तरी पोहोचतील हे नक्कीच.

मार्च २०२२मध्ये श्रीलंका देशाच्या गंभीर आर्थिक संकटाविरोधात सर्वात मोठे जनआंदोलन झाले. सरकारच्या धोरणांविरोधात, बेरोजगारीविरोधात जनतेने रस्त्यावर उतरत आक्रमक आंदोलने केली. श्रीलंकेमधील काही बंदरांवर चीनचे नियंत्रण आणि चीनच्या श्रीलंकेवर असलेल्या आठ अरब अमेरिकन डॉलरच्या कजार्ची पार्श्वभूमीही यामागे होती. जुलै-ऑगस्ट २०२४ मध्ये हिंसक विद्यार्थी आंदोलनांमुळे बांगलादेशात प्रचंड उद्रेक झाला. स्वातंत्र्यसेनानींच्या वंशजांना सरकारी नोकऱ्यांमध्ये ३० टक्के आरक्षण, बेरोजगारी आणि आर्थिक विषमता ही या आंदोलनाची महत्त्वाची कारणे होती. या आंदोलनात ३०० जणांचा मृत्यू झाला. आंदोलकांनी पंतप्रधान कार्यालयावर कब्जा करून जाळपोळ केली. अफगाणिस्तान व पाकिस्तानमध्ये इस्लामिक दहशतवादाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात आहे. भारत-पाकिस्तान संबंध अत्यंत गुंतागुंतीचे आणि तणावपूर्ण आहेत, ज्यामध्ये काश्मीर वाद, सीमापार दहशतवाद आणि लष्करी संघर्ष यांसारख्या दीर्घकालीन समस्यांचा समावेश आहे.

आतापर्यंत अनेक युद्धे आणि चकमकी झाल्या आहेत. भारत-पाकिस्तान संबंध सुधारू शकले नाहीत. पाकिस्तानवर चीनचा असलेला प्रभाव हाही भारतासाठी चिंतेचा विषय आहे.

केवळ ५५ लाखांच्या आसपास लोकसंख्या असलेल्या मालदीवची अर्थव्यवस्था मासेमारी आणि पर्यटनावर अवलंबून आहे. चीनकडून मालदीवने मोठ्या प्रमाणात कर्ज घेतले असून, मालदीव आर्थिक संकटांचा सामना करत आहे. जानेवारी २०२४ मध्ये भारत आणि मालदीवचे ऐतिहासिक संबंध भारताच्या पंतप्रधानांवर केलेल्या वंशवादाच्या आरोपांमुळे ताणले गेले होते.

गेले काही दिवस नेपाळमध्ये व देशभरात जेन झी आणि नेपो बेबी हे दोन शब्द खूप चर्चेत आहेत. १९९७ ते २००२च्या दरम्यान जन्मलेल्या पिढीला जनरेशन झेड किंवा जेन-झी म्हटले जाते. ही पिढी डिजिटल टेक्नॉलॉजी, इंटरनेट, सोशल मीडिया आणि स्मार्टफोन यासोबतच वाढली आहे. तसेच रोजगाराच्या शोधात जगभरात गेलेल्या नेपाळी बांधवांबरोबर ही पिढी सोशल मीडियाच्या माध्यमातून संपर्कात आहे, तर नेपो बेबी किंवा नेपोटिझम बेबी म्हणजे प्रसिद्ध व्यक्तींची मुलं, जी आई-वडिलांच्या नावामुळेच यशस्वी आणि प्रसिद्ध झाली असे मानले जाते. मागील आठवड्यात नेपाळमध्ये फेसबूक, व्हॉट्सॲप, इन्स्टाग्राम आणि यूट्यूबसारख्या एकूण २६ सोशल मीडिया साइट्सवर बंदी घालण्यात आली. यामुळे देशात मोठा विरोध, असंतोष आणि उद्रेक झाला. त्यानंतर सोमवारपासून ही जेन-झी पिढी सोशल मीडियावरून थेट रस्त्यावर उतरली. हजारो तरुण-तरुणींनी पंतप्रधान के. पी. शर्मा ओली सरकारविरुद्ध तीव्र आंदोलन सुरू केले. या आंदोलनाच्या काही दिवस आधी ह्यजेन-झीह्ल पिढीतील काही नेत्यांनी नेपाळमधील प्रसिद्ध व्यक्ती व राजकारण्यांच्या मुलांचे आणि गरीब लोकांच्या मुलांचे फोटो एकत्रित ठेवून तुलना करणारे व्हिडीओ सोशल मीडियावर पोस्ट केले होते. यातून या आंदोलनाला धार येत गेली. नेपाळमध्ये असलेली बेरोजगारी, सरकारच्या धोरणांविरोधात असंतोष, दडपशाही, राज्यकर्त्यांचा भ्रष्ट कारभार, अस्थिरता यामुळे आंदोलकांचा उद्रेक झाला. पंतप्रधान के. पी. ओली यांच्यासह अनेक मंत्र्यांना राजीनामा देऊन देश सोडावा लागला. या आंदोलनावर श्रीलंका आणि बांगलादेशच्या आंदोलनाचा प्रभाव दिसून येतो, तर चीनशी वाढती जवळीक हेही यामागचे कारण आहे.

भारताने काय धडा घ्यावा?

या सगळ्या घडामोडी घडामोडी भारताचे शेजारी असलेल्या देशांबरोबर सुरू असून त्याचा प्रत्यक्ष- अप्रत्यक्ष परिणाम भारतावर होत आहे. आंतरराष्ट्रीय घडामोडी आणि मोठ्या राष्ट्रांची ढवळाढवळ यामागे प्रकर्षाने आहे. भारताने यातून योग्य धडा घेणे गरजेचे असून तरुणाईच्या शक्तीला विधायक वळण देण्याची गरज आहे. लोकशाहीवरील जनतेचा विश्वास कायम राहून अधिक दृढ कसा होईल याचे प्रयत्न केले पाहिजेत.

जनतेच्या हाताला काम आणि डोक्याला शांतता कशी लागेल याचे प्रयत्न केले पाहिजेत. धार्मिक ध्रुवीकरणातून अल्पकाळ सत्ता मिळू शकते, पण समाधान आणि शांतता नाही, हे सत्ताधाऱ्यांनी कायम लक्षात ठेवले पाहिजे. भारताचे संविधान ही देशाची सर्वात मोठी ताकद आहे, सरकारं येतात-जातात, पण संविधानावर देश सक्षमपणे उभा आहे. त्यामुळे धार्मिक उन्मादापेक्षा देशाचा संविधानिक ढाचा अधिक महत्त्वाचा आहे. प्रसारमाध्यमे, निवडणूक आयोग, ईडी, सीबीआय या स्वायत्त संस्थांचे स्वातंत्र्य टिकवणे महत्त्वाचे आहे. लोकशाहीच्या माध्यमातून रक्ताचा एकही थेंब न सांडता देशात मतपेटीतून सत्ताबदल करता येतो ही जनतेमधील भावना कायम राहिली पाहिजे.

मजीर्तील मूठभर उद्योजकांच्या हातात राष्ट्रीय संपत्तीचे खासगीकरण आणि एकत्रीकरण नको, राजकारण्यांनी-धनिकांनी आठ पिढ्यांसाठी संपत्ती गोळा करणे आणि त्याचे विकृत प्रदर्शन करणे सोडले पाहिजे. धार्मिक द्वेषावर कुठलाही देश उभा राहू शकत नाही, याची परिणती विध्वंसातच होऊ शकते. शेजारच्या दक्षिण आशियाई देशांची परिस्थिती पाहता भारताने अधिक जबाबदारीने वागायला पाहिजे.

प्रसिद्ध शायर राहत इंदुरी यांच्याच भाषेत सांगायचे झाल्यास...

लगेगी आग तो आएँगे घर कई जद में, यहाँ पे सिर्फ हमारा मकान थोड़ी है !

एका चहाच्या सेवनाने खराब कोलेस्ट्रॉल झपाट्याने कमी होईल

शरीरात वाढलेले खराब कोलेस्ट्रॉल कमी करायचे आहे का? तर आज आम्ही तुम्हाला एक उत्तम मार्ग सांगणार आहोत. अनेकजण दररोज दुधाचा चहा किंवा कॉफी पिण्याऐवजी ग्रीन टी पितात. वास्तविक ग्रीन टी आपल्या आरोग्यासाठी खूप फायदेशीर आहे. ग्रीन टी प्यायल्याने अनेक आजारांपासून बचाव होतो. शिवाय, वजन कमी करण्यासाठी आणि हृदयविकार कमी करण्यासाठी ग्रीन टी फायदेशीर आहे.

ग्रीन टीमध्ये भरपूर प्रमाणात अँटी-ऑक्सिडंट गुणधर्म असतात त्यामुळे ते संपूर्ण शरीरासाठी फायदेशीर असते. ग्रीन टीमध्ये पॉलीफेनॉल असते ज्यामुळे कर्करोगाचा धोका कमी होतो. चला तर मग जाणून घेऊया ग्रीन टीचे इतर कोणते फायदे आहेत?

ग्रीन टी पिण्याचे फायदे

NCBकवर प्रकाशित केलेल्या संशोधनानुसार

ग्रीन टीमध्ये पॉलिफेनॉल आणि पॉलिसेकेराइड असतात जे मधुमेहींसाठी फायदेशीर असतात. ग्रीन टी रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्याचा प्रयत्न करते. ग्रीन टीचे सेवन केल्याने शरीरात साठलेली चरबी कमी होते. ग्रीन टी शरीरातील चयापचय प्रक्रिया वाढवण्याचा प्रयत्न करते. जे वजन कमी करण्यास मदत करते. वजन कमी करण्याच्या आहारात तुम्ही ग्रीन टीचा समावेश करू शकता.

कोलेस्ट्रॉल कमी करण्यास उपयुक्त

हेल्थ लाइननुसार, खराब कोलेस्ट्रॉल कमी करण्यात ग्रीन टी महत्त्वाची भूमिका बजावते. ग्रीन टी चांगले कोलेस्ट्रॉल वाढवण्याचे काम करते. ग्रीन टीच्या सेवनाने हृदयाघाताचा धोका कमी होतो. जर तुम्हाला उच्च रक्तदाबाची समस्या असेल तर तुम्ही ग्रीन टीचे नियमित सेवन करावे. यामुळे उच्च रक्तदाबाचा धोका दूर होतो.

ग्रीन टी कसा बनवायचा

जर तुम्ही ग्रीन टी बॅग्ज वापरत नसाल तर तुम्ही अशा प्रकारे ग्रीन टी पिऊ शकता. यासाठी प्रथम पाणी उकळून घ्या. त्यात ग्रीन टी टाका आणि थोडा वेळ झाकून ठेवा आणि गॅस बंद करा आणि नंतर ग्रीन टी गाळून प्या.

ग्रीन टी पिण्याची योग्य वेळ

तुम्ही दिवसातून दोन ते तीन वेळा ग्रीन टी पिऊ शकता. व्यायामापूर्वी तुम्ही ग्रीन टी पिऊ शकता, ही चहा तुमच्या शरीराला ऊर्जा देते. तसेच तुम्ही नाश्ता केल्यानंतर अर्धा तासाने ही चहा पिऊ शकता. तसंच जेवण करण्यापूर्वी किंवा नंतर अर्धा तासाने ग्रीन टी पिऊ शकता. तुम्ही रात्री झोपण्याच्या दोन तास आधीही ग्रीन टी पिऊ शकता.

पनीर खाण्याचे फायदे

प्रत्येक जण नवीन वर्षात नवनवीन निर्धार करत असतात. अशात अनेकजण आरोग्याच्या दृष्टीने वजन कमी करण्याचाही निर्धार करतात. आज आम्ही तुम्हाला वजन कमी करण्यासाठी एक सोपा उपाय सांगणार आहोत.

वजन कमी करायचं असेल तर तुम्ही पर्याय म्हणून पनीर खाऊ शकता. कारण पनीर हा उत्तम पर्याय आहे. चला तर सविस्तर जाणून घ्या.

पनीर हा अनेकांना आवडणारा पदार्थ आहे. अनेकदा जेवणाच्या अनेक मेन्युमध्ये पनीरचा समावेश केला जातो. पनीर हा आरोग्याच्या दृष्टीनेही तितकाच फायदेशीर आहे. शाकाहारी लोकांसाठी पनीर हा प्रोटीन देणारा उत्तम पर्याय आहे.

त्यात जर तुम्ही वजन कमी करण्याचा विचार करत असाल तर प्रोटीन तुम्ही खायलाच हवं. पनीरमध्ये प्रोटीन्ससह, व्हिटॅमिन्स, कॅल्शियम आणि फॉस्फरस असतात जे शरीरासाठी खूप फायदेशीर असतात.

पनीर खाण्याचे फायदे

पनीरमध्ये प्रोटीनचे प्रमाण अधिक असते. जर तुम्ही आहारात पनीरचा समावेश करत असाल तर उत्तम पर्याय आहे.

पनीर हे लो कॅलरीयुक्त पदार्थ आहे. त्यामुळे कमी कॅलरी असलेले पनीर वजन कमी करण्यासाठी फायदेशीर आहे.

जर तुम्ही डाएट करत असाल तर तुम्ही पनीर खाऊ शकता. शरीराला हेल्दी फॅट देण्यास पनीर उत्तम पर्याय आहे.

पनीरमध्ये असलेले कॉंजुगेटेड लिनोलिक ऍसिड चरबी जाळण्यास मदत करते. ज्यामुळे वजन आपोआप कमी होते.

पनीर खाल्याने भूक कमी होते त्यामुळे वजन कमी करण्यास मदत होते.

वजन नियंत्रित ठेवायचंय?

गाजर हे आरोग्याच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. त्यामुळे अनेकदा डॉक्टरसुद्धा गाजराचा आहारात समावेश करण्याचा सल्ला देतात. गाजरमध्ये बीटा-कॅरोटीन असते जे एक अँटिऑक्सिडेंट असते. ज्याचा शरीराला खूप फायदा असतो. जर तुम्ही दररोज गाजराचा ज्युस पिलात तर याचा तुम्हाला पुरेपुर फायदा होणार. आज आपण याविषयीच जाणून घेणार आहोत.

दररोज एक ग्लास गाजराचा ज्युस पिणे आरोग्यासाठी उत्तम असते. गाजराचा ज्युस पिल्यामुळे रोगप्रतिकारशक्ती वाढते. गाजर हे बीटा-कॅरोटीनचा उत्तम स्त्रोत आहे, ज्यामुळे शरीरात व्हिटॅमिन ए मध्ये बदलते आणि रोगप्रतिकारशक्ती वाढते.

दररोज गाजराचा ज्युस पिल्याने वजन सुद्धा नियंत्रित राहण्यास मदत होते. त्यामुळे डाएट करणाऱ्यांनी आवर्जून गाजराचा ज्युस प्यावा.

एवढंच काय तर गाजराचा ज्युस पचनशक्तीसुद्धा कमी करते.

याशिवाय गाजराचा ज्युस पिल्याने रक्तातील साखरेची पातळी कमी होते आणि कोलेस्ट्रॉलची लेव्हलही कमी होते. तसेच गाजरातील बीटा-कॅरोटीनसुद्धा डोळ्यांचं आरोग्य सुदृढ ठेवते.

याशिवाय कर्करोगग्रस्त रुग्णांनाही डॉक्टर गाजराचा ज्युस पिण्याचा सल्ला देतात.

कॉफी व लिंबू प्यायल्याने वजन होते कमी?

आपल्यापैकी अनेकजण स्वतः वजन कमी करण्याच्या मोहिमेवर असतील, अगदीच नाही तर अशा कोणाला ओळखत असतील जे आपल्या वजनाला घेऊन चिंतित आहेत. अशा मंडळींना वजनापेक्षा जास्त वजन कमी करण्यासाठी दिल्या जाणाऱ्या सल्ल्यांचा जास्त वैताग येतो. प्रत्येकाकडून वेगवेगळ्या गोष्टी ऐकताना नेमकं करावं काय हे आपल्यालाही अनेकदा कळत नाही. अशावेळी सर्वात सोपा उपाय म्हणजे डॉक्टरांचा सल्ला. आज आपण तज्ज्ञ वजन कमी करण्यासाठी ऑनलाईन दिलेल्या सल्ल्याची डॉक्टरांनी केलेली पडताळणी जाणून घेणार आहोत. हा व्हायरल सल्ला म्हणजे कॉफी व लिंबू एकत्र पिणे. आजवर आपण लेमन टी हा प्रकार ऐकला असेल पण लेमन कॉफी म्हणजे काय व खरंच याचा फायदा वजन कमी करण्यासाठी होऊ शकतो का हे जाणून घेऊयात.

कॉफीच्या सेवनाने वजन कमी होते का?

कविता सांगतात की, तुम्ही एक पॅकेट चिप्स खाण्याआधी जर एक ग्लास पाणी प्यायलात तर तुमची भूक झटपट कमी होते. जर तुम्ही दोन ग्लास पाणी प्यायलात तर तुम्हाला काही खाण्याची इच्छाही होत नाही. ७० ते ८० या दशकात अनेक मॉडेल्स रॅम्प वॉकआधी कॉफी प्यायच्या.

कॉफीमुळे आपल्या शरीरातील बेसल मेटाबॉलिक रेट (BMR) वाढतो. कॅफिन न्यूरोट्रांसमीटर एडेनोसिन ला ब्लॉक करण्याचे काम करतो तसेच डोपामाइन या न्यूरोट्रांसमीटरला वाढवण्यास मदत करते. जर आपल्याला मेटाबॉलिक रेट अधिक वाढवायचा असेल तर एका दिवसात अधिकाधिक कॉफीचे सेवन करावे लागेल पण असे केल्याने आपल्या स्वास्थ्यावर अगदीच विपरीत परिणाम होऊ शकतो.

लिंबाच्या सेवनाने वजन कमी होते का?

वजन कमी करण्यासाठी अनेक तज्ज्ञ लिंबू पाणी पिण्याचा सल्ला देतात. कविता सांगतात की, लिंबामध्ये व्हिटॅमिन सी, अँटी ऑक्सिडंट्स, फोलेट व अन्य खनिजे असतात, यामुळे आपल्या शरीराला डिटॉक्स करण्यात मदत होऊ शकते. याशिवाय कोलेस्ट्रॉल कमी करण्यास सुद्धा यामुळे मदत होऊ शकते. लिंबू पाणी प्यायल्यावर त्यातील क्षार आपला पोटाच्या विकारांपासून बचाव करू शकतात. तर शरीर हायड्रेटेड ठेवण्यासाठी सुद्धा याची मदत होते.

कॉफी व लिंबू प्यायल्याने वजन होते कमी?

दरम्यान, कॉफी व लिंबू यांचे अलिप्त फायदे असले तरी एकत्र त्यांचे सेवन केल्याने तुमचे वजन कमी होईलच याची काही शाश्वती नाही. आहारतज्ज्ञ कविता देवगन यांनी इंडियन एक्सप्रेसला सांगितले की, कॉफी व लिंबू आपल्याला वजन कमी करण्यास मदत करू शकतील याचे काही ठोस पुरावे नाहीत पण या पेयाच्या सेवनाने आपली भूक नियंत्रणात राहते किंबहुना कमी होते. जेव्हा तुम्ही कॅफिनचे सेवन करता तेव्हा अधून मधून लागणारी छोटी भूक कमी होते व सतत खात राहण्याची इच्छा मिटते. त्यामुळे व्हायरल ट्रिक्सच्या अंधानुकरणाला बळी पडू नका.

उच्चरक्तदाब व्याधीग्रस्तांसाठी कॉफी धोकादायक

उच्चदाब अनेक व्याधींचे कारण ठरत असले तरी यामुळे हृदयरोगाचा अधिक धोका असतो. या पार्श्वभूमीवर आरोग्यतज्ज्ञ रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचा सल्ला देतात. नियमित व्यायाम आणि पोषक आहार हे त्यासाठी उपयुक्त ठरते, असे तज्ज्ञांचे मत आहे. योग्य आहार नसेल तर रक्तदाब वाढण्याचा धोका असतो. या व्याधीग्रस्तांनी आहारात सोडियमचे प्रमाण कमी करावे, तसेच अधिक कॉफी पिणे टाळावे, असे नुकत्याच केलेल्या एका संशोधानात स्पष्ट झाले. जपानी संशोधकांच्या म्हणण्यानुसार रक्तदाब धोकादायक पातळीवर असेल तर एका दिवसात दोन किंवा त्यापेक्षा अधिक कप कॉफी ही रक्तदाब वाढवण्यास कारण ठरते. अमेरिकेतील ह्यहार्ट असोशिएशनह्ल्च्या संशोधनानुसार मद्य हेदेखील रक्तदाब वाढण्याचे एक कारण आहे. या व्याधीग्रस्तांसाठी तर मद्य अधिक धोकादायक आहे. मद्याचा विपरीत परिणाम हृदय, मूत्रिपड, यकृतावरही होतो. त्यामुळे मद्यपानापासून दूर राहण्याचा सल्ला तज्ज्ञ देतात.

लवंग भिजवून खाल्ल्याने डायबिटीजसह 'हे' ७ त्रास वेगाने होतात दूर?

डायबिटीज असल्यास तुमच्या आहाराकडे विशेष लक्ष देण्याचा सल्ला दिला जातो. आपल्या नियमित आहारात पण असे काही पदार्थ असतात ज्यांच्यामुळे स्वादुपिंडात इन्सुलीनचे उत्पादन होण्याचा वेग मंदावतो. परिणामी ब्लड शुगर एकाएकी बूस्ट होण्याचा धोका असतो. जर डायबिटीजवर वेळीच नियंत्रण ठेवले नाही तर आपले हृदय, मेंदू, डोळे, किडनी, असे सर्वच अवयव धोक्यात येतात. तज्ज्ञांच्या माहितीनुसार डायबिटीजच्या रुग्णांसाठी त्यांच्या किचनमधील हा एक मसाल्याचा पदार्थ चमत्कारिक ठरू शकतो. आहारात या मसाल्याचा समावेश केल्यास डायबिटीज नियंत्रण सोप्पे होऊ शकते. हा जादुई मसाला कोणता व त्याचे नेमके काय फायदे आहेत? तसेच नियमित आहारात आपण त्यांचा कसा समावेश करू शकतो हे आता आपण पाहुयात..

एम्स रुग्णालयाचे माजी सल्लागार व साओल हार्ट सेंटरचे संस्थापक डॉ. बिमल झांजेर सांगतात की, डायबिटीजच्या रुग्णांसाठी लवंगाचे अगदीच फायदेशीर ठरू शकते. या मसाल्याचे ग्लायसेमिक इंडेक्स कमी असतो. तसेच यामुळे ब्लड शुगरही नियंत्रणात राहू शकते.

डायबिटीज नियंत्रणात लवंग कशी करते मदत?

अँटी डायबिटिक व अँटी -इंफ्लेमेटरी गुणसत्व असणाऱ्या लवंगांमुळे इंसुलीनचा स्तर नियंत्रित राहतो .

अँटी ऑक्सिडंट्स पॅनक्रियाजमध्ये इन्सुलिन तयार करण्याचा वेग वाढवतात.

लवंगांमध्ये व्हिटॅमिन सीचा मुबलक साठा असतो. यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते.

लवंगाचे शरीराला अन्य फायदे

लवंग पाण्यात भिजवून ठेवल्यास ते पाणी प्यायल्याने पचनप्रक्रिया सुद्धा वेगवान होऊ शकते. तुम्हाला जर शौचास साफ न होण्याची समस्या असेल तर लवंगाच्या पाण्याने नक्कीच मदत होऊ शकते.

लवंगाचे सेवन तुमच्या शरीरातील जंत बाहेर काढून टाकण्यास मदत करतात.

प्रवासात मळमळ जाणवत असेल तर लवंगाचे सेवन फायदेशीर ठरते.

दृष्टी कमजोर झाली असल्यास सुद्धा लवंगाच्या सेवनाने फायदा होऊ शकतो.

दातदुखीवर सुद्धा लवंग परिणामकारक आहे.

थंडीच्या दिवसात सतत कफ होत असल्यास लवंगाचे सेवन करून आराम मिळू शकतो.

डायबिटीज रुग्णांनी लवंगाचे सेवन कसे करावे?

ब्लड शुगर नियंत्रणात ठेवण्यासाठी डायबिटीजच्या रुग्णांनी एक ग्लास पाण्यात ८ ते १० लवंगा बिजवून ठेवाव्यात, नंतर हे पाणी उकळून थंड करून ठेवावे. हे पाणी प्यावे व नरम झालेल्या लवंगा सुद्धा चघळून एक एक करून खाऊ शकता.

कॉफी फेस पॅक

कॉफी ही आपल्या त्वचेच्या समस्यांकरता देखील तितकीच फायदेशीर आहे. होयं हे खरयं कॉफीच्या या गुणधर्मांविषयीची माहिती खूपच कमी लोकांना आहे. मात्र, हे अगदी खर आहे. कॉफीमध्ये अनेक पोषकद्रव्ये आणि तत्वांचा समावेश आहे. त्यामुळे ही कॉफी आपल्या त्वचेसाठी, टाळूसाठी आणि केसांसाठी खूपच लाभदायी आहे.

एका अभ्यासात हे समोर आलं की, कॉफी ही त्वचेला हेल्दी बनवते. कॅफीइक एसिड हे असे ऍन्टी ऑक्सिडेंट आहे, जे कोलेजन लेव्हल वाढवते. यामुळे एक प्रकारे तुमच्या चेहऱ्यावर सुरकुत्या पडत नाही. आता अनेक ब्युटी प्रोडक्टमध्ये कॉफीचा वापर होत आहे. यासोबतच व्हिटॅमिन- ई देखील फायदेशीर आहे.

हिवाळ्यामध्ये त्वचेची विशेष काळजी घ्यावी लागते. सामान्य त्वचा, कोरडी त्वचा आणि सेन्सिटिव्ह त्वचा हे त्वचेचे तीन प्रकार आहेत. थंडीमध्ये जर तुम्ही केमिकल्स असणाऱ्या प्रोडक्टचा वापर केला तर तुम्हाला रॅश येणे आणि त्वचा कोरडी पडणे या समस्या जाणवतील. त्यामुळे जर तुम्हाला स्किनवर ग्लो आणायचा असेल तर तुम्ही या कॉफी फेस पॅकचा वापर करू शकता. हा फेसपॅक तुम्ही घरच्या घरी तयार करू शकता.

कॉफी फेस पॅक कसा तयार करायचा?

कॉफी फेस पॅक तयार करण्यासाठी कॉफी मध, दूध आणि हळद पावडर एका वाटीमध्ये घेऊन मिक्स करा. त्यानंतर एका ब्रशने किंवा हाताने मिक्स केलेला हा पॅक चेहऱ्यावर लावा. पॅक 10 मिनीटे चेहऱ्यावर ठेवा. त्यानंतर कोमट पाण्याने चेहरा धूतल्यानंतर टॉव्हेलने चेहरा पुसा.

कॉफी फेस पॅक लावायचे फायदे

1) त्वचेवरील डेड सेल्स जातील.

2) चेहऱ्यावर ग्लो येतो.

3) चेहऱ्यावरील डाग निघून जातात.

लिव्हर खराब होण्याचा धोका वाटतोय? तर ओव्याचे पाणी ठरेल रामबाण औषध

लिव्हर हा आपल्या शरीराचा एक महत्त्वाचा भाग आहे जो रक्त शुद्ध करतो आणि शरीरातील विषारी पदार्थ काढून टाकतो. तेलकट-मसालेदार अन्न, तूप, लोणी, मलईदार दूध आणि मटण यासारखे आहार घेतल्यास फॅटी लिव्हर होऊ शकते किंवा लिव्हरच्या आजारांचा धोका वाढू शकतो. अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे लिव्हर खराब होण्याचा धोका देखील वाढतो. लिव्हर मध्ये बिघाड झाला की त्याची लक्षणे शरीरात दिसू लागतात. भूक न लागणे, उलट्या होणे, झोप न लागणे, दिवसभर थकवा आणि आळस येणे, जलद वजन कमी होणे ही लिव्हरच्या समस्यांची लक्षणे असू शकतात. लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी आहाराची काळजी घेणे अत्यंत आवश्यक आहे.

लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी ओवा खूप प्रभावी ठरतो. ओवा किचनमध्ये उपलब्ध असलेला असा मसाला आहे जो औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण आहे. यामध्ये भरपूर मात्रा मध्ये तेल असते. जे अनेक बायोएक्टिव्ह संयुगे बनलेले आहे. या तेलामुळेच त्याचे औषधी महत्त्व अधिक आहे. ओवा हा एक मसाला आहे जो पाचक फायबरचा चांगला स्त्रोत आहे. त्यामुळे आतड्याचे आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. ओव्यामध्ये जबरदस्त उपचारात्मक गुणधर्म आहेत. औषधी गुणधर्मांनी समृद्ध असलेल्या ओव्याचा वापर लिव्हर निरोगी ठेवण्यासाठी खूप प्रभावी ठरतो. आयुर्वेद तज्ज्ञ आचार्य बालकृष्ण यांच्या मते, ओव्याचे पाणी उकळल्यानंतर त्याचा वापर केल्यास लिव्हरच्या आजारांपासून आराम मिळतो. ओवा लिव्हर कसे निरोगी ठेवते आणि त्याचे सेवन केल्याने कोणते रोग बरे होतात ते जाणून घेऊया..

ओव्याचे पाणी लिव्हर बरे करण्यासाठी प्रभावी आहे जर तुम्ही जास्त मद्य प्यायले असेल किंवा अल्कोहोल प्यायल्याने लिव्हर खराब झाला असेल तर तुम्ही ओव्याचे पाणी प्यावे. दारूच्या व्यसनापासून मुक्त होण्यासाठी ओव्याचे पाणी देखील प्रभावी आहे. ओव्याच्या पाण्याचे नियमित सेवन केल्याने लिव्हरचे कार्य सुरळीत होण्यासह अन्नातून पोषक तत्वांचे शोषण वाढण्यास मदत होते.

ओव्याचे पाणी बनवण्यासाठी १०० ग्रॅम ओवा घ्या आणि ८०० मिली पाण्यात ते पाणी २५० मिली पर्यंत कमी होईपर्यंत उकळा. हे पाणी गाळून बाटलीत भरून ठेवा आणि दररोज जेवणापूर्वी एक कप पाणी प्या. याचे सेवन केल्याने लिव्हर निरोगी राहते आणि दारूच्या व्यसनातूनही सुटका होते.

ओव्याचे पाणी हृदय निरोगी ठेवते

अँटी-ऑक्सिडंट गुणधर्मांनी समृद्ध असलेले ओव्याचे पाणी हृदयरोग्यांसाठी वरदान आहे. अँटिऑक्सिडंट खराब कोलेस्ट्रॉल नियंत्रित करते आणि हृदय निरोगी ठेवते.

मुंबईतील अटल सेतूजवळील रस्त्यावर मोठा खड्डा, रस्ते वाहतुकीवर परिणाम

■मुंबई। प्रतिनिधी,

शिवडी येथील अटल सेतू जवळील फ्री वे मेसेंट रोड रस्त्याच्या ठिकाणी भला मोठा खड्डा पडल्याची गंभीर घटना गुरुवारी घडली. त्यामुळे रस्ते वाहतुकीवर परिणाम झाला. सुदैवाने कोणताही गंभीर अपघात झाला नाही. मात्र, ही गंभीर घटना शिवसेनेचे माजी नगरसेवक सचिन पडवळ आणि काही शिवसैनिकांनी मुंबई महापालिका प्रशासन, मुंबई पोर्ट ट्रस्ट, एमएमआरडीए, शिवडी पोलीस ठाणे, वडाळा वाहतूक विभाग पोलीस अधिकारी यांच्या निदर्शनास आणण्यात आली. त्यानंतर त्याठिकाणी तातडीने उपाययोजना करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली. राज्य शासनाने केंद्र सरकारच्या परवानगीने अटल सेतू उभारून त्यावर वाहतूक सेवा सुरू केली. त्यामुळे मुंबई ते पनवेल, उरण अंतर जलदगतीने आणि कमी अंतराने गाठणे सुलभ झाले. या अटल सेतूजवळील रस्त्याचा काही भाग अचानकपणे खचून त्याठिकाणी खड्डा पडल्याचे स्थानिक शिवसैनिकांच्या गुरुवारी निदर्शनास आले. त्यानंतर या गंभीर घटनेची तातडीने दखल घेऊन शिवसेनेचे माजी नगरसेवक नगरसेवक सचिन पडवळ यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी सदर ठिकाणी मुंबई मनपा, मुंबई पोर्ट ट्रस्ट, एमएमआरडीए, शिवडी पोलीस ठाणे, वडाळा वाहतूक विभाग पोलिस अधिकारी या सर्व संबंधित यंत्रणांच्या अधिकाऱ्यांना सदर ठिकाणी बोलावण्यात आले. सदर घटनेबाबत वस्तुस्थिती त्यांच्या लक्षात आणून देण्यात आली. तसेच त्यावर कायमस्वरूपी मार्ग काढावा, अशी मागणी माजी नगरसेवक सचिन पडवळ यांनी यावेळी केली. या खड्ड्यांमुळे शिवडीकडे जाणारा मार्ग बंद झाल्यामुळे वाहतुकीची कोंडी झाली. तसेच, वाहतुकीवर नियंत्रण ठेवण्यासाठी वडाळा वाहतूक विभाग, मुंबई पोर्ट ट्रस्ट यांनी या ठिकाणी अतिरिक्त कर्मचारी उपलब्ध करून द्यावेत, मुंबई महापालिकेने या ढासळलेल्या नाल्यावरील भाग पुन्हा बांधून घ्यावा. खड्डा बुजवावा आणि तसेच खड्ड्यात पडलेला स्लॅब काढून घेण्यात यावा. जेणेकरून पावसाळी पाण्याचा निचरा तात्काळ होईल, अशा मागण्यादेखील शिवसेनेतर्फे यावेळी करण्यात आली. या वेळी, संतोष मळेकर (कार्यकारी अभियंता, मुंबई मनपा), विलास कोल्हे (उपप्रमुख अभियंता, मुंबई पोर्ट ट्रस्ट), अर्जुन कोरगावकर (कार्यकारी अभियंता, एमएमआरडीए), आदिनाथ गावडे (पोलीस निरीक्षक, वडाळा वाहतूक विभाग) विकास बेंडवार (पीएसआय, शिवडी पोलीस ठाणे), माजी नगरसेवक सचिन पडवळ, शाखाप्रमुख बैजू हिंदोळे शिवसेना शाखा क्रमांक २०६ तसेच शिवडीच्या पूर्व विभागातील पदाधिकारी, स्थानिक नागरिकदेखील उपस्थित होते.

इमारती रिकाम्या न करणे महागात; वसईतील दोन इमारतीतील पाच सदस्यांना प्रत्येकी २५ हजारांचा दंड

■मुंबई। प्रतिनिधी,

धोकादायक इमारत रिकामी करण्यास सांगणाऱ्या आदेशाच्या पुनर्विचाराची मागणी करणे वसई (पश्चिम) येथील ह्यपुष्पांजलीह्न आणि ह्यदीपांजलीह्न या सोसायटीतील पाच सदस्यांना महागात पडले आहे. न्यायालयाने या पाच सदस्यांची याचिका फेटाळताना त्यांना प्रत्येकी २५ हजार रुपये दंड सुनावला. तसेच, एक आठवड्यात दोन्ही इमारती रिकाम्या करण्याची अंतिम मुदत दिली. आदेशाच्या पुनरावलोकनाची मागणी करून या पाच सदस्यांनी कायदेशीर प्रक्रियेचा दुरूपयोग केला आहे. त्यामुळे, त्यांची ही मागणी दंडासह फेटाळणे गरजेचे असल्याची टिप्पणीही न्यायमूर्ती गिरीश कुलकर्णी आणि न्यायमूर्ती मंजुषा देशपांडे यांच्या खंडपीठाने केली. पुनर्विकासात अडथळा आणणारा दृष्टिकोन प्रतिकूल ठरू शकतो. मूळात, अल्पसंख्य सदस्यांना सोसायटीतील इतर सदस्यांचा जीव धोक्यात घालण्याचा अधिकार नाही, असे निरीक्षण नोंदवून याचिकाकर्त्यांसह दोन्ही इमारतीतील अल्पसंख्य सदस्यांना घरे रिकामी करण्याचे आदेश दिले होते. या आदेशाच्या पुनर्विचारासाठी याचिका केली होती. याचिकाकर्त्यांनी अवलंबलेल्या पद्धतीला सर्वोच्च न्यायालय आणि मुंबई उच्च न्यायालयाने नेहमीच नाकारले आहे. पुनर्विचार याचिका विचारात न घेण्याचे दुसरे कारण म्हणजे २१ ऑगस्ट रोजीचा आदेश पुनर्विकासात अडथळा निर्माण करणाऱ्या सोसायटीच्या अल्पसंख्य सदस्यांच्या विरोधात आणि बहुसंख्य सदस्यांच्या हिताच्या दृष्टीने देण्यात आला होता, असे न्यायालयाने याचिका फेटाळताना स्पष्ट केले. याचिकाकर्त्यांना सोसायटीतील बहुसंख्य सदस्यांच्या हिताच्या विरोधात निर्णय घेणे शक्य नव्हते. तसेच, इमारतीतील बहुसंख्य घरे आधीच रिकामी करण्यात आली आहेत हेही न्यायालयाने याचिकाकर्त्यांना दिलासा नाकारताना नमूद केले.

वसईत सशस्त्र दरोड्याचा कट उधळला, ११ जणांना अटक

■ विरार। प्रतिनिधी,

वसई पूर्वेच्या एव्हरशाईन सिटी येथे मंगळवारी रात्री दरोडा टाकण्याच्या तयारीत असर्णाया अकरा जणांच्या टोळीचा कट उधळून टाकण्यात पोलिसांना यश आले आहे. यावेळी आरोपींकडून एक देशी बनावटीचे पिस्तुल आणि चार जिवंत काडतुसे जप्त करण्यात आली आहेत. वसईच्या गुन्हे प्रकटीकरण शाखा २ तसेच वालीव, माणिकपूर आणि आचोळे पोलीस ठाण्याच्या पथकांकडून ही कारवाई करण्यात आली. मंगळवारी रात्री वसई पूर्वेच्या एव्हरशाईन सिटी येथील राम रहीम नगर परिसरातील एक बंगल्यात सशस्त्र दरोडा टाकण्याच्या हेतूने काही जण येणार असल्याची माहिती वसईच्या गुन्हे प्रकटीकरण शाखा २ ला प्राप्त झाली होती. यानुसार पोलिसांच्या पथकाने या परिसरात सापळा रचला होता.

यावेळी करण्यात आलेल्या कारवाईत ११ जणांना अटक करण्यात आली असून आरोपींकडून दरोडा टाकण्यासाठी आणलेले इतर साहित्य असा १ लाख ७७ हजार किंमतीचा मुद्देमालही जप्त करण्यात आला आहे. कुमार साबळे (२९), ईब्राउद्दिन चौधरी (२४), कार्तिक कुमार सिंग (२४), गुरुप्रीत सिंग लबाना (३०), कैलास चिखले (५१) विष्णू खरात (२१) सचिन भालेराव (२६), विक्रम हरिजन (२२), रमजान कुरेशी (२४), गणेश भासले (३०) गणेश जाधव (१९) अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे असून यातील आठ आरोपी सराईत गुन्हेगार असून त्यांच्या विरोधात पालघर, मुंबई आणि ठाणे येथील विविध पोलीस ठाण्यात १३ गुन्ह्यांची नोंद आहे.

गणेशोत्सवात एसटीच्या ठाणे विभागाला ६ कोटींचे उत्पन्न!

■ठाणे। प्रतिनिधी,

गणेशोत्सव हा सण कोकणात मोठ्या उत्साहात साजरा केला जातो. या सणानिमित्ताने कोकणात जाणाऱ्या प्रवाशांची संख्या मोठ्या प्रमाणावर असते. यासाठी दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) विशेष गाड्यांचे नियोजन केले होते. यात ठाणे विभागात २ हजार ६३० बसगाड्यांचे नियोजन होते. त्यामुळे तब्बल ९६ हजार ५१० प्रवाशांनी प्रवास केला. गणेशोत्सव काळातील या विशेष नियोजनामुळे एसटीच्या तिजोरीत ६ कोटी ९१ लाख ६ हजार ५३२ रूपयांच्या उत्पन्नाची भर पडली.

कोकणात गणेशोत्सव, शिमगा हे सण पारंपारिक पद्धतीने साजरे होतात. ठाणे, कल्याण, डोंबिवली, अंबरनाथ, बदलापूर या शहरांमध्ये कोकणातील रहिवासी नोकरी, व्यवसायाच्या निमित्ताने अधिक संख्येने राहतात. परंतु सण उत्सव साजरे करण्यासाठी ते आपल्या मुळ गावी जातात. या सर्व प्रवाशांची कोणतीही गैरसोय होऊ नये यासाठी ठाणे रेल्वे आणि एसटी विभागाने दरवर्षीप्रमाणे यंदाही महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने (एसटी) विशेष गाड्यांचे नियोजन केले होते. यामुळे प्रवाशांना आधीच आरक्षण करून कोणत्याही त्रासाविना आणि गर्दी

विना कोकणात जाता आले.

ठाणे विभागाच्या सात आगारांतून गणेशोत्सवासाठी चिपळूण, रत्नागिरी, गुहागर, लांजा, साखरपा, देवगड, कणकवली, सावंतवाडी, सिंधुदुर्ग, रायगड या ठिकाणी जादा बसगाड्या सोडण्यात आल्या, त्यामुळे या ठिकाणच्या प्रवाशांची सोय झाली. या बससाठी प्रवाशांनी आगाऊ नोंदणी केली होती. ठाणे विभागातून कोकणात जाणाऱ्या प्रवाशांसाठी १९४ बसगाड्यांची व्यवस्था होती. परंतु प्रवाशांची वाढती संख्या पाहता इतर विभागातून २ हजार ४३६ बसगाड्यांची मदत घेण्यात आली होती. त्याचबरोबर गणेशोत्सवानंतर कोकणहून ठाणेकडे परतणाऱ्या प्रवाशांसाठीही विशेष बससेवा सुरू करण्यात आली होती. या परतीच्या प्रवासासाठी मुंबई आणि ठाणे विभाग मिळून २५८ बसगाड्या ठेवण्यात आल्या होत्या.

2 दिवसात 466 हरकती, सूचनांवर सुनावणी पूर्ण

■मुंबई। प्रतिनिधी,

मुंबई महापालिकेच्या आगामी निवडणुकीसाठी महापालिकेने तयार केलेल्या नवीन प्रभाग रचनेबाबत मुंबईकरांनी 493 हरकती व सूचना नोंदविल्या आहेत. त्यावर महापालिकेने बुधवार, 10 सप्टेंबरपासून यशवंतराव प्रतिष्ठान येथे सुनावणी सुरू केली आहे. पहिल्याच दिवशी 189 हरकती आणि सूचनांवर सुनावणी पार पडली. तर, गुरुवारी दुसऱ्या दिवशी पूर्व उपनगरातील 277 हरकती आणि सूचनांवर सुनावणी पार पडली. त्यामुळे दोन दिवसात 466 हरकती आणि सूचनांवर सुनावणी पार पडली आहे.

शुक्रवारी, 12 सप्टेंबर रोजी शेवटच्या दिवशी शहर भागातील उर्वरित हरकती आणि सूचना यांवर सुनावणी पार पडणार आहे. त्यानंतर मुंबई महापालिका निवडणुकीसाठी प्रभाग रचना अंतिम करण्यासाठी निर्णय घेण्यात येणार आहे. त्यावर राज्य निवडणूक आयोगाकडून शिक्कामोर्तब होणार आहे. दुसऱ्या दिवशीच्या सुनावणीला महाराष्ट्र शासनाने नियुक्त केलेले प्राधिकृत अधिकारी म्हणून राज्याचे अपर मुख्य सचिव (गृह) इकबालसिंह चहल यांची उपस्थिती होती. तर, मुंबई महापालिकेच्या वतीने अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी, विशेष कार्य अधिकारी (निवडणूक) विजय बालमवार, सह आयुक्त (निवडणूक आणि कर निर्धारण व संकलन) विश्वास शंकरवार आणि सहाय्यक आयुक्त (कर निर्धारण व संकलन) गजानन बेल्लाळे यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

मुंबई महापालिका सार्वत्रिक निवडणुकीसाठी विविध टप्पे निश्चित करण्यात आले आहेत. या अंतर्गत 22 ऑगस्ट रोजी

प्रारूप प्रभागांच्या भौगोलिक सीमा प्रसिद्धीची अधिसूचना जारी करण्यात आली होती. त्यावर 22 ऑगस्ट ते 4 सप्टेंबर या कालावधीत हरकती व सूचना मागविण्यात आल्या. या प्रारूप रचनेसंदर्भात प्राप्त सूचना व हरकतीपैकी 277 हरकती आणि सूचनांवर गुरुवारी सुनावणी पार पडली. तर, बुधवारी 10 सप्टेंबर म्हणजेच सुनावणीच्या पहिल्या दिवशी 189 सूचना व हरकतींवर सुनावणी झाली होती. या दोन्ही दिवसांची मिळून एकूण 466 हरकती व सूचनांवरील सुनावणीची प्रक्रिया पूर्ण झाली आहे.

तर, उर्वरित हरकती व सूचनांवर शुक्रवार 12 सप्टेंबर रोजी सुनावणी होईल. यासाठी हरकतदार नागरिकांनी यशवंतराव चव्हाण केंद्र, जनरल जगन्नानथराव भोसले मार्ग, नरिमन पॉईंट, मुंबई या ठिकाणी सुनावणीसाठी प्रत्यक्षात उपस्थित राहावे, असे आवाहन महापालिका प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे.

गणपती दर्शनाच्या बहाण्याने अल्पवयीन मुलाचे अपहरण; मुलाचा थरारक प्रवास, पोलिसांचा तपास आणि आरोपी गजाआड

■बदलापूर। प्रतिनिधी,

गणेशोत्सवासाठी वडिलांच्या गावी गुजरातला गेलेल्या एका अल्पवयीन मुलाला त्याच्याच ओळखीच्या लोकांनी गणपती दर्शनाच्या नावाखाली पळवून नेले आणि त्याच्या आईकडे १२ लाख रुपयांची खंडणी मागितल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. मात्र बदलापूर ग्रामीण पोलिसांनी चार दिवसांच्या अथक तपासानंतर तीन आरोपींना अटक करून मुलाला सुखरूप त्याच्या आईकडे परत आणले आहे. पोलिसांच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे. वांगणी येथील एका महिलेचा अल्पवयीन मुलगा ३१ सप्टेंबर रोजी

गुजरातमधील आपल्या वडिलांच्या गावी गणेशोत्सव पाहण्यासाठी गेला होता. मडोसा गावातील आपल्या ओळखीच्या लोकांना त्याने याची कल्पना दिली होती. तो गावी जाऊन त्यांना भेटला आणि त्यांच्यासोबत गणपती दर्शनासाठी निघाला. याचवेळी आरोपींनी त्याला एका चारचाकी गाडीतून जंगलात नेले आणि डांबून ठेवले. त्यानंतर त्यांनी मुलाच्या आईला फोन करून त्याच्या सुटकेसाठी १२ लाख रुपयांची मागणी केली. घाबरलेल्या आईने तात्काळ बदलापूर ग्रामीण पोलिस ठाण्यात धाव घेऊन हा सर्व प्रकार सांगितला. त्यांनंतर याप्रकरणी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेत पोलिस निरीक्षक गोविंद पाटील यांनी तात्काळ दोन पथके गुजरातला रवाना केली. गुजरातमधील पोलिसांनी त्या गावात तपास सुरू केल्याची माहिती आरोपींना मिळाली. त्यानंतर या आरोपींच्या पायाखालची वाळू सरकली आणि आरोपी घाबरले. त्यांनी दुसऱ्याच दिवशी मुलाला एका बस थांब्यावर सोडून पळ काढला. त्यानंतर बदलापूर पोलिसांनी तांत्रिक तपास करून मडोसा येथून एका आरोपीला ताब्यात घेतले. पुढील तपासातून लक्ष्मण खैर, नरेश खैर आणि अनिल खैर या आणखी आरोपींना राजस्थान सीमेजवळून अटक करण्यात आली.

सैनिकाची रायफल पळवली, सुरक्षा यंत्रणेने कोणती घोडचूक केली?

■मुंबई। प्रतिनिधी,

नेव्ही नगरमध्ये एका सैनिकाची फसवणूक करून त्याच्याकडील रायफल, मॅगझीन आणि 40 जिवंत काडतुसे घेऊन पळवण्याचा 6 सप्टेंबर रोजी घडला. मात्र, एका सैनिकाची फसवणूक कशी केली, यासाठी आरोपीने कोणते तंत्र वापरले, यातून धडा घेऊन सुरक्षाव्यवस्थेत बदल करणार का, असे अनेक प्रश्न उपस्थित राहिले आहेत. या निमित्ताने आपली सुरक्षा यंत्रणा किती गाफील आहे, हे अधोरेखित झाले आहे. एखाद्या व्यक्तीचे लक्ष विचलित करण्यासाठी मोबाईल फोनवर बोलण्याचे नाटक करणे, ही गुन्हेगारांची जुनी पद्धत आहे. नेव्ही नगरमधील रायफल चोरी प्रकरणातील मुख्य आरोपी राकेश दुबला यानेही नेमके हेच केले. या प्रकरणी मुंबई गुन्हे शाखेने मंगळवारी (9 सप्टेंबर) रात्री उशिरा तेलंगणामधून राकेश दुबला आणि त्याचा भाऊ उमेश दुबला यांना अटक केली. गंभीर बाब म्हणजे या प्रकरणातील तक्रारदार सैनिक आलोक सिंग हा देखील संशयाच्या भोवऱ्यात आहे.

नेव्ही नगरमध्ये नक्की काय घडलं?

मुंबईतील कुलाबा परिसरातील शेवटचे टोक म्हणजे नेव्ही नगर. या उच्च सुरक्षा क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी दोन दरवाजे आहेत. एक वाहनांसाठी तर दुसरा दरवाजा पादचाऱ्यांसाठी आहे. राकेश दुबला याने आत जाण्यासाठी पादचारी दरवाजाची निवड केली होती. 6 सप्टेंबर रोजी संध्याकाळी या दरवाजातून प्रवेश करण्यापूर्वी त्याने जाणूनबुजून डोक्यावर टोपी घातली होती आणि ती खाली वाकलेली होती. हे करण्यामागे सीसीटीव्हीपासून चेहरा लपवण्याचा प्रयत्न होता. शिवाय, त्याने त्याचे ओळखपत्र हातात ठेवले होते. आत प्रवेश करताना कानाला मोबाईल लावत कुणाशी तरी बोलण्याचे नाटक केले आणि तिथूनच ओळखपत्र दाखवून त्याने आत प्रवेश केला. गेटवर उभ्या असलेल्या सुरक्षा कर्मचाऱ्यांना त्याची देहबोली ओळखीची वाटली. त्यामुळे कुणालाही त्याच्यावर संशय आला नाही. मुंबई गुन्हे शाखेच्या एका अधिकाऱ्याच्या मते, देहबोली ओळखीची वाटल्याने विश्वास ठेवला, ही सुरक्षेतील ही सर्वात मोठी घोडचूक होती. तक्रारदार सैनिक ज्युनियर सेलर आलोक सिंग यांच्या कथेवर पूर्णपणे विश्वास ठेवणे ही सुरक्षा व्यवस्थेतील दुसरी मोठी चूक होती. आलोक सिंग याने सांगितले होते की, 6 सप्टेंबर रोजी ड्युटीवर असताना संध्याकाळी एक अज्ञात व्यक्ती त्याच्याकडे आली. त्यांनी स्वतःची ओळख त्यांचा वरिष्ठ म्हणून करून दिली आणि अनंत चतुर्थीला प्रचंड गर्दी असल्याने नवीन हायअलर्ट आला आहे. म्हणून ते त्याच्या जागी ड्युटी करतील, हे स्पष्ट केले.

प्रभादेवी पूल बंद केल्याने वाहतुकीत बदल

■प्रभादेवी। प्रतिनिधी,

प्रभादेवी येथील १२५ वर्षांहून अधिक जूना पूल शुक्रवारी रात्रीपासून वाहतुकीसाठी बंद केला जाणार आहे. तर पूल बंद केल्यानंतर मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) पुलाचे पाडकाम करत त्याजागी द्विस्तरीय पूल बांधला जाणार आहे. पाडकाम आणि नवीन द्विस्तरीय पुलाचे काम पूर्ण करत नवीन द्विस्तरीय पूल वाहतूक सेवेत दाखल करण्यासाठी किमान २० महिन्यांचा कालवाधी अपेक्षित आहे. त्यामुळे प्रभादेवी पूल बंद करताना या पुलावरुन जाणारी वाहतूक इतरत्र वळविण्यात आली असून वाहतूकीत अनेक बदल करण्यात आले आहेत.

वाहतुकीतील बदल असे

पूर्वेकडून पश्चिमेकडे जाणार्या वाहनांकरीता

-दादर पूर्वकडून दादर पश्चिमेकडे आणि दादर मार्केटकडे जाणाऱ्या वाहन चालकांना टिळक पुलाचा वापर करावा लागेल.

-परळ पूर्वकडून प्रभादेवी आणि लोअर परळला जाणाऱ्या वाहन चालकांना करी रोड पुलाचा वापर सकाळी ७ ते दुपारी ३ या वेळेत करावा लागेल.

-परळ, भायखळा पूर्वकडून प्रभादेवी, वरळी, सागरी किनारा मार्ग आणि सागरी सेतूच्या दिशेने जाणाऱ्या वाहन चालकांना चिंचपोकळी पुलाचा वापर करावा लागेल.

पश्चिमेकडून पुर्वेकडे जाणाऱ्या वाहनांकरीता

-दादर पश्चिमेकडून दादर पुर्वकडे जाणाऱ्या वाहन चालकांना टिळक पुलाचा वापर करावा लागणार आहे.

-प्रभादेवी आणि लोअर परळ पश्चिमेकडून परळला, टाटा रुग्णालय, केईएम रुग्णालयाकडे जाणाऱ्या वाहन चालकांना करी रोड पुलाचा वापर दुपारी ३ ते रात्री ११ वाजेपर्यंत करावा लागणार आहे.

-सागरी किनारा मार्ग आणि सागरी सेतू तसेच प्रभादेवी, वरळीकडून परळ, भायखळा पूर्वकडे जाणाऱ्या वाहन चालकांना चिंचपोकळी पुलाचा वापर करावा लागणार आहे.

१५ ऑगस्टला कार रॅली काढली; महिन्याभराने गुन्हा दाखल...

■ ठाणे। प्रतिनिधी,

स्वातंत्र्यदिनी मुंब्रा शहरात कार रॅली काढण्यात आली होती. सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याने तसेच रॅलीत जीवाला धोका निर्माण होईल अशा प्रकारे कार चालविल्याने हा गुन्हा दाखल झाला आहे. स्वातंत्र्यदिनी १५ ऑगस्टला वाय जंक्शन, शिळफाटा भागात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. कार्यक्रमाला मुंब्रा पोलिसांनी

परवानगी दिली होती. परंतु काही तरुणांनी विना परवाना कार रॅली काढली होती. त्याचे चित्रीकरण काही दिवसांपूर्वीच मुंब्रा पोलिसांना प्राप्त झाले. यानंतर पोलिसांनी कारवाईस सुरुवात केली. रॅली दरम्यान तरुण कारच्या खिडकीमधून बाहेर डोकावून वाहने चालवित होते. याप्रकरणी मुंब्रा पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे. सार्वजनिक वाहतुकीस अडथळा निर्माण केल्याने तसेच रॅलीत जीवाला धोका निर्माण होईल अशा प्रकारे कार चालविल्याने हा गुन्हा दाखल झाला आहे. महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ चे कलम १३५, ३७ (३), महाराष्ट्र मोटार वाहन नियम, १९८९ चे कलम १८४ आणि भारतीय न्याय संहिता (बीएनएस), २०२३ चे कलम १२५, २२३, २८१ प्रमाणे कारवाई करण्यात आली आहे.

तीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या सावत्र वडिलांना जन्मठेप

■पुणे। प्रतिनिधी,

तीन वर्षांच्या मुलीवर अत्याचार करणाऱ्या सावत्र वडिलांना विशेष न्यायाधीश कविता शिरभाते यांनी जन्मठेप आणि २५ हजार रुपये दंडाची शिक्षा सुनावली आहे. आरोपीने मुलीवर अत्याचार करताना क्रौयार्ची परिसीमा गाठली. अत्याचारामुळे मुलीवर शस्त्रक्रिया करावी लागल्याचे नमूद करत विशेष न्यायाधीश कविता शिरभाते यांनी आरोपीला मरेपर्यंत जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

याबाबत पीडित मुलीच्या आईने वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. ५ फेब्रुवारी २०१८ रोजी ही घटना घडली होती. गुन्हा घडण्यापूर्वी दोन महिने आधी फियार्दी महिलेने आरोपीशी विवाह केला होता आरोपीला पहिल्या पत्नीपासून दोन मुले आहेत. घटनेच्या दिवशी रात्री नऊ वाजता आरोपीने पत्नीशी भांडण करून तिच्या तीन वर्षांच्या मुलीला जबरदस्तीने घराबाहेर नेले. त्यानंतर मध्यरात्री साडेबाराच्या सुमारास आरोपी मुलीला घेऊन घरी आला. त्यावेळी मुलगी रक्ताने माखली होती. या घटनेनंतर घाबरलेल्या आईने वारजे पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दिली. त्यानंतर आरोपीला अटक करण्यात आली. तत्कालीन पोलिस उपनिरीक्षक मीरा त्र्यंबके यांनी तपास करुन आरोपीविरुद्ध आरोपपत्र दाखल केले. या खटल्यात सरकार पक्षाकडू विशेष सरकारी वकील नितीन कोंघे यांनी बाजू मांडली. फियार्दी महिलेच्या वतीने ऍड. गौरव जाचक यांनी बाजू मांडली. ह्यमुस्कानह्न या स्वयंसेवी संस्थेने फिर्याद महिलेला सहायक केले.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com